
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १९८
www.ramprahar.com
सोमवार, ३ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

देशभर होणार आयुष औषधी केंद्र/२
नवी मुंबईत आज जनता दरबार/६
रसायनीत फिट इंडिया मॅरेथॉनला प्रतिसाद/८

## पुण्याचा पृथ्वीराज मोहोळ ठरला ‘महाराष्ट्र केसरी’



**अहिल्यानगर :** राज्य कुस्तीगीर संघ व जिल्हा कुस्तीगीर संघातर्फे अहिल्यानगर येथील कै. बलभीमआण्णा जगताप क्रीडा नगरीत आयोजित महाराष्ट्र केसरी स्पर्धेत पुण्याच्या पुण्याचा पृथ्वीराज मोहोळ याने सोलापूरचा महेंद्र गायकवाड याच्यावर दोन गुणांनी मात करीत महाराष्ट्र केसरीचा किताब पटकावला. अटीतटीच्या झालेल्या या लढतीत उंचपुऱ्या आणि धिप्पाड शरीरयष्टी लाभलेल्या महेंद्रला पृथ्वीराजने जोरदार टक्कर दिली. पहिल्या राऊंडमध्ये दोघांनी एक-एक गुण घेतला होता. दुसऱ्या राऊंडमध्ये तुल्यबळ लढत झाली. अगदी शेवटच्या मिनिटाला पृथ्वीराजने एक गुण मिळवला, पण पंचांचा हा निर्णय महेंद्रला मान्य झाला नाही व त्याने कुस्ती अर्धवट सोडली. त्यानंतर पंचांनी दोन गुण मिळवलेल्या पृथ्वीराजला विजयी घोषित केले.

# भारताच्या लेकी जगात भारी!

## अंडर-१९ वर्ल्डकपचे विजेतेपद दुसऱ्यांदा पटकाविले

**क्वालालंपूर : वृत्तसंस्था**

भारतीय १९ वर्षाखालील महिला संघ पुन्हा एकदा विश्वविजेता ठरला आहे. यंदाच्या अंडर-१९ टी-२० विश्वचषक स्पर्धेत अजिंक्य राहिलेल्या भारताच्या महिला संघाने रविवारी (दि. २) अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेचा नऊ विकेट्सने पराभव करत ट्रॉफीवर सलग दुसऱ्यांदा आपले नाव कोरले.




अष्टपैलू त्रिशा गोंगाडीसह इतर गोलंदाजांनी केलेल्या भेदक माऱ्यासमोर दक्षिण आफ्रिकेचा डाव अवघ्या ८२ धावांतच आटोपला. त्यानंतर हे माफक लक्ष्य भारतीय संघाने अवघ्या ११.२ षटकांमध्येच गाठले. त्रिशाने या सामन्यात ४४ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले तसेच गोलंदाजीतही तीन विकेट्स घेतल्या. याशिवाय फिरकीपटू पारूनिका सिसोदिया, वैष्णवी शर्मा आणि आयुषी शुक्ला यांनी प्रत्येकी दोन, तर वेगवान गोलंदाज शबनम शकील हिने एका फलंदाजाला बाद केले.

दरम्यान, भारताच्या त्रिशाने अंतिम सामन्यातील सर्वोत्तम खेळाडूसह संपूर्ण स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा मान पटकावला. तिने ३०९ धावा काढत भारताचीच श्वेता सेहरावतचा विक्रम मोडला.



## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये ‘मूल्योत्सव’

### वार्षिक स्नेहसंमेलन अन् पारितोषिक वितरण

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी (दि. १) मोठ्या उत्साहात झाला. याची थीम मूल्योत्सव अशी होती. या वेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले, तर वर्षभरात प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.



‘रयत’चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून ‘रयत’चे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, स्कूलचे चेअरमन परेश ठाकूर, शकुंतला ठाकूर, ‘रयत’चे रायगड विभागीय निरीक्षक मोहन कोंगरे, सहाय्यक निरीक्षक भानूदास खटावकर, स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, स्कूल कमिटी सदस्य निलेश खारकर, कविता खारकर यांच्यासह शिक्षक, शिकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी, उपस्थित होते. मान्यवरांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

या वेळी मूल्योत्सव अंतर्गत शैक्षणिक मूल्ये, शिस्तप्रियता, वक्तशीरपणा, स्वच्छतेचे महत्त्व, शाळेविषयी प्रेम, स्त्री-पुरुष समानता, मोठ्यांचा आदर, ध्येयनिश्चिती अशा विषयांवर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये विविध विषयांत प्राविण्य मिळविलेले विद्यार्थी; त्याचप्रमाणे क्रीडा क्षेत्रात, वक्तृत्व स्पर्धेत चमकदार कामगिरी बजावणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले, तर विशेष स्पर्धेत सहभागी झालेल्या पालकांचेही कौतुक केले गेले.

### सन्मान सोहळा



**पनवेल : भूमिपुत्रांचे कैवारी, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त एकवीरा, कला, क्रीडा सामाजिक आणि शैक्षणिक संस्था तसेच बी.के. पाटील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कामोठे येथे सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह इतर मान्यवरांना सन्मानित करण्यात आले.** **(वृत्त पान ३ वर..)**

## सापुताऱ्यामध्ये बस दरीत कोसळून सात जणांचा मृत्यू

**सापुतारा : वृत्तसंस्था**

नाशिक-गुजरात महामार्गावर सापुतारा येथे रविवारी (दि. २) पहाटे एक खासगी बस २०० फूट खोल दरीत कोसळली. या भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू झाला असून १५ जण गंभीर जखमी झाले आहेत.

अपघात झालेल्या बसमध्ये ४८ प्रवासी प्रवास करत होते. ही बस नाशिकच्या त्र्यंबकेश्वरहून गुजरातमधील द्वारका येथे जात होती. सापुतारा हिल स्टेशनजवळ पहाटे सव्वाचारच्या सुमारास सुमारास बसचालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला, अशी माहिती पोलीस अधीक्षक एस.जी. पाटील यांनी दिली. बस रस्त्याच्या कडेला लावण्यात आलेले बॅरिकेड्स तोडून खोल दरीत कोसळली. बसमधील भाविक मध्य प्रदेशमधील गुणा, शिवपुरी आणि अशोक नगर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## निवडक

### पूजा खेडकरच्या पालकांच्या संपत्तीची माहिती मागवली

**पुणे :** नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करून आयएएस पदाचा लाभ मिळविणाऱ्या वादग्रस्त प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांच्या वडील आणि आईच्या नावावरील मालमत्तांची माहिती द्यावी, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाने राज्याच्या नोंदणी महानिरीक्षकांकडे केली आहे. त्यातून दोघांच्या नावावर असलेल्या मालमत्तांची एकत्रित माहिती गोळा करून प्रशासनाची समिती उत्पन्नाची मर्यादा ठरविणार आहे.

### प्रयागराजमध्ये आज तिसरे अमृत स्नान

**प्रयागराज :** महाकुंभात वसंत पंचमीच्या दिवशी विशेष अमृत स्नानाचे आयोजन ३ फेब्रुवारीच्या ब्रह्म मुहूर्तावर करण्यात येणार आहे. या सोहळ्यात यापुढे कोणतीही चूक नको, असे निर्देश उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिले आहेत.

## मुंबई विमानतळावर ५० कोटींचे हायड्रोपोनिक विड, सोने, हिरे जप्त

### आठ जणांना अटक; कस्टम विभागाची कारवाई

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर ५० कोटींहून अधिक किमतीचे हायड्रोपोनिक विड, सोने आणि हिरे जप्त करण्यात आले आहेत. यासोबतच कस्टम विभागाने आठ जणांना अटक केली आहे. २८ जानेवारी ते ३१ जानेवारीदरम्यान विशेष कारवाई ही जप्ती करण्यात आली.

सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, मुंबई विमानतळावर केलेल्या या विशेष कारवाईत ५०.१६ कोटी रुपये किमतीचे ५०.११ किलो हायड्रोपोनिक वीड, ९३.८ लाख रुपये किमतीचे हिरे आणि १.५ कोटी रुपये किमतीचे २.०७३ किलो सोने जप्त करण्यात आले आहे. हायड्रोपोनिक विड एक प्रकारची नशा आहे. हे गांजाच्या श्रेणीत येते. आंतरराष्ट्रीय स्तरावर याला खूप मागणी आहे. त्यामुळेच त्याची मोठ्या प्रमाणात तस्करी होते.

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दररोज तस्करीची प्रकरणे समोर येत आहेत. गेल्या महिन्यातच विमानतळावर सोन्याच्या तस्करीचे मोठे प्रकरण उघडकीस आले होते. महसूल गुप्तचर संचालनालयाने गुप्त माहितीच्या आधारे छापा टाकला होता. या कारवाईत विमानतळावर काम करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांच्या ताब्यात घेतले. ते दोघे तस्करीचे सोने विमानतळाबाहेर नेत असताना रंगेहात पकडण्यात आले. यामुळे कस्टम विभाग सतर्क झाला आहे.

## दिल्लीत आता ‘आप’दा सरकार नको!

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जाहीर सभेत हल्लाबोल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीची ‘आपदा’ म्हणजेच आप सरकारने येथील नागरिकांची ११ वर्षे वाया घालवली. दिल्लीकरांना माझे आवाहन आहे की, या वेळी भाजपाला त्यांची सेवा करण्याची संधी द्यावी. मी तुम्हाला गॅरंटी देतो प्रत्येक नागरिकाची अडचण दूर करण्यासाठी मी मेहनत घेईन. आपल्याला असे सरकार आणायचे आहे जे सरकार दिल्लीची सेवा करेल. आपल्याला आता आपदा सरकार नको, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. २) आप



सरकारवर हल्लाबोल केला.

पंतप्रधान मोदींनी दिल्लीच्या आरके पुरम या ठिकाणी सभा घेतली. त्या वेळी ते बोलत होते. दिल्लीत या वेळी भाजपचे सरकार येणार आहे. मतदानाच्या आधीच झाडूच्या काड्या काड्या विखरून गेल्या आहेत. आपदाचे नेतेही त्यांची साथ सोडत आहेत, कारण आता दिल्लीकरांनाच नाही तर आपमधल्या लोकांनाही समजले आहे की, आपवर दिल्ली नाराज आहे. दिल्लीकरांच्या मनात जो राग आहे त्यामुळे आपदा पक्षाचे लोक घाबरले गेले आहेत. ते रोज काहीतरी खोट्या घोषणा करत आहेत. १० वर्षांपासून खोटे बोलून ते मते मागत आहेत, पण आता आपचा मुखवटा उतरला आहे, अशी जोरदार टीका पंतप्रधान मोदींनी केली.

एकीकडे आप खोट्या घोषणा आहेत, दुसरीकडे मी तुमचा सेवक आहे. माझी गॅरंटी म्हणजे आश्वासन पूर्ण होण्याची गॅरंटी हे विसरू नका. आम्ही जो अर्थसंकल्प आणला तो सामान्य जनतेचा अर्थसंकल्प आहे. १० वर्षांत भारताची अर्थव्यवस्था १०व्या क्रमांकावरून आपण पाचव्या क्रमांकावर आणली आहे. १२ लाख रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांना सरकारने दिलासा दिला आहे. पंडित नेहरू, इंदिरा गांधी किंवा काँग्रेसचे सरकार असते, तर त्यांनी १२ लाखांच्या उत्पन्नावर एक चतुर्थांश म्हणजेच जवळपास तीन लाख रुपये कर घेतला असता, असे म्हणत पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवरही शरसंधान साधले.

## शुभ वर्तमान! सहा वर्षीय मुलाची जीबीएसवर मात

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सध्या गिया बॅरे (जीबीएस) रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक रुग्णांची संख्या आहे, तर आतापर्यंत चार जणांनी जीबीएसमुळे प्राण गमावले आहेत. याबाबत नकारात्मक बातम्या येत असताना पिंपरी चिंचवडमधून एक दिलासादायक बातमी आली आहे. एका सहा वर्षांच्या चिमुरड्याने जीबीएसवर यशस्वीपणे मात केली आहे.

व्हेंटिलेटर, आयसीयू अन् मग जनरल वॉर्ड असे १४ दिवसांचे उपचार घेऊन चिमुरडा आता ठणठणीत बरा झाला आहे. जीबीएसवर मात केल्यानंतर त्याला घरीदेखील सोडण्यात आले आहे. सध्या त्याच्यावर फिजिओथेरपीचे उपचार सुरू आहेत. लवकरच तो या उपचारांमुळे ठणठणीत बरा होईल, अशी आशा त्यांच्या कुटुंबीयांना आहे.




**मुंबई : इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या व अंतिम टी-२० सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना २४७ धावांचा डोंगर उभारला. या दरम्यान अभिषेक शर्माने धमाकेदार शतक झळकावले. त्याने ५४ चेंडूंचा सामना करीत १३५ धावा केल्या. यात १३ षटकार आणि सात चौकारांचा समावेश होता. इंग्लंडच्या गोलंदाजांची धुलाई करीत अभिषेकने अवघ्या ३७ चेंडूत शतक ठोकले. रोहित शर्मानंतर सर्वात जलद शतक झळकावणारा अभिषेक भारताचा दुसरा फलंदाज ठरला आहे.**

## नमो चषक अंतर्गत कामोठ्यात ८ फेब्रुवारीला रस्सीखेच स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलच्या वतीने भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५ आयोजित करण्यात आला असून त्या अंतर्गत ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता कामोठे येथे रस्सीखेच स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी प्रवेश निःशुल्क असून विजेत्यांना भरघोस रकमेची बक्षिसे असणार आहेत.



कामोठे सेक्टर ६ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मैदानावर ही स्पर्धा पुरुष व महिला अशा गटात होणार आहे. यामध्ये पुरुष गटातील प्रथम क्रमांकाला सात हजार रुपये व चषक, द्वितीय पारितोषिक पाच हजार रुपये व चषक, तृतीय पारितोषिक तीन हजार रुपये व चषक; तर महिला गटातील प्रथम पारितोषिक सात हजार रुपये व चषक, द्वितीय पारितोषिक पाच हजार रुपये व चषक, तृतीय पारितोषिक तीन हजार रुपये व चषक तसेच प्रत्येक फेरीतील विजेत्या संघाला रोख एक हजार रुपये असे बक्षिसांचे स्वरूप आहे.

या स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी नोंदणीची अंतिम तारीख ५ फेब्रुवारी आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी विद्या तामखडे (९९२०६४८७७३), हरजिंदरकौर हॅपी सिंग (९३२३१८५८६६), वनिता पाटील (९२२१२७७११६), नितीन कवडे (९७६८४९३३३३) किंवा अजय मोरे (९९३०३८२०६०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पंढरपुरात श्री विठ्ठल रुक्मिणीचा शाही विवाह; भाविकांची गर्दी

**पंढरपूर : प्रतिनिधी**

आजपर्यंत अनेक विवाह सोहळे झाले व होतील, पण जर देव देवतेचा विवाह असेल तर.. असाच एक विवाह सोहळा वसंत पंचमीच्या मुहूर्तावर येथील श्री विठ्ठल रुख्मिणीचा झाला, तोही शाही पद्धतीने. मंगल अक्षता, सनई चौघडे आणि उपस्थित वऱ्हाडी मंडळींच्या साक्षीने हा विवाह सोहळा पार पडला. या वेळी भाविकांची गर्दी दिसून आली.



शिशिर म्हणजे थंडी संपून वसंत म्हणजे उन्हाळा सुरू होतो. सतत सुंदर भासणारा निसर्ग वसंत ऋतूत सोळा कलांनी फुलून उठतो. वसंतच्या आगमनाने सृष्टी फुलून जाते. सर्वत्र चैतन्याचे वातावरण तयार होते. या ऋतुमध्ये पांढरे वस्त्र परिधान केले तर उन्हाची तीव्रता कमी होते. म्हणूनच वसंत पंचमीपासून ते रंगपंचमीपर्यंत विठ्ठलास पांढराशुभ्र पोषाख परिधान करण्यात येतो.

वसंत पंचमीपासून ते रंगपंचमीपर्यंत म्हणजे एक महिना विठ्ठलाची रंगपंचमी सुरू राहील. या उत्सवाचा शुभारंभ वसंत पंचमीच्या निमित्ताने झाला. या काळात दररोज गुलालांची उधळण भगवंताच्या अंगावर केली जाते.

### शाही मंडपात सोहळा

विठ्ठल रुक्मिणी मातेची अलंकाराने सजवलेली उत्सवमूर्ती या विवाह सोहळ्याच्या ठिकाणी म्हणजे विठ्ठल सभामंडपातील फुलांनी सजविण्यात आलेल्या शाही मंडपात आणण्यात आली. दोन्ही देवता मुंडावळ्या बांधून आणल्या गेल्या. यानंतर अंतरपाट धरण्यात आले आणि मंगलाष्टकास सुरुवात झाली. यानंतर सर्व उपस्थित भाविकांनी शाही विवाह सोहळा साजरा केला.

# देशभर होणार आयुष औषधी केंद्र

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची माहिती

**पुणे : प्रतिनिधी**


आयुर्वेदाला जगभर सर्वमान्यता मिळू लागली आहे. प्रभावी आयुर्वेदासाठी संशोधनाची व्याप्ती वाढवण्यासह 'इनोव्हेशन व स्टार्टअप' सुरू करण्यासाठी आयुष मंत्रालयामार्फत चालना दिली जाईल. सर्वगुणकारी आयुष औषधी सहज उपलब्ध होण्यासाठी देशभरात आयुष औषधी केंद्रांचे जाळे उभारण्यात येणार आहे, असे केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले.



डॉ. डी. वाय. पाटील (अभिमत) विद्यापीठ संचालित डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आयुर्वेद अँड रिसर्च सेंटर यांच्या पुढाकाराने नवी दिल्ली येथील ऑल इंडिया आयुर्वेद काँग्रेस, नेदरलँड येथील इंटरनॅशनल महर्षी आयुर्वेद फाउंडेशन व इंटरनॅशनल कॅडमी ऑफ आयुर्वेद यांच्या सहकार्याने आयोजित आठव्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संमेलनाच्या उद्‌घाटनावेळी ते बोलत होते.

विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, प्र-कुलगुरू व डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटीच्या सचिव डॉ. स्मिता जाधव, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, अमेरिकास्थित शास्त्रज्ञ डॉ. टोनी नाडर, आयुष मंत्रालयाचे सल्लागार सचिव वैद्य मनोज नेसरी या वेळी उपस्थित होते.

जाधव म्हणाले, योग व आयुर्वेद ही भारताची ओळख आहे. शंभराहून अधिक देशांत आयुर्वेद पोहोचला आहे, तर १८० देशांत योगदिवस साजरा केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून आयुर्वेदाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. डॉ. डी. वाय. पाटील आयुर्वेद महाविद्यालयांसारख्या संस्थांमध्ये संशोधन व विकास केंद्राची उभारणी करण्याचा विचार सुरू आहे. अनेक औषधांना 'आयएसओ' मानांकन दिले जात आहे. देशातही घराघरांत आयुर्वेद जाण्यासाठी 'देश का प्रकृती परीक्षण' उपक्रम आणला असून, त्यामध्ये सव्वा कोटी लोकांची माहिती संकलित केली आहे.



**खालापूर : भाजपचे तालुका उपाध्यक्ष तथा तांबाटी ग्रामपंचायत माजी सरपंच अनिल जाधव यांनी बांधलेल्या नूतन गणपती मंदिराच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळा शनिवारी झाला. दरम्यान, पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी तेथे जाऊन गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आदी उपस्थित होते. त्याचप्रमाणे भाजप प्रभारी तालुकाध्यक्ष सनी यादव, सरचिटणीस रवींद्र पाटील, ट्रान्सपोर्ट आघाडी तालुकाध्यक्ष हरिभाऊ जाधव, कामगार आघाडी तालुकाध्यक्ष सचिन जाधव, मोहन घाडगे, विकास मोरे यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक हजर होते.**

# नेरळ येथे माघी गणेशोत्सवात रक्तदान शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथील पाडा भागात असलेल्या श्री सिद्धिविनायक मित्र मंडळ कडून माघी गणेशोत्सव मध्ये रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या रक्तदान शिबिरात ६० रक्तदात्यांनी रक्तदान करून पवित्र अधिकार बजावला.

नेरळ पाडा येथील श्री सिध्दीविनायक गणपती मंदिरात माघी गणेशोत्सव साजरा होत आहे. येथील श्री सिद्धिविनायक मित्र मंडळाच्या वतीने साजरा होत असलेल्या माघी गणेशोत्सवात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. लोकमान्य रक्तपेढी कडून रक्त संक्रमण करण्यात आले आणि ६० रक्तदात्यानी रक्तदानाचे पवित्र अधिकार बजावला. यावेळी रक्त संक्रमण डॉ. करण राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य तंत्रज्ञ बबिता यादव, प्रतीक्षा चौधरी, सुनील शर्मा यांनी प्रक्रिया पूर्ण केली. या रक्तदान शिबिरात मोठ्या प्रमाणात महिला रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्यात श्री सिद्धिविनायक मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सर्वाधिक रक्तदान केले.



## सरपंच अहिल्या नाईक यांची नियुक्ती

**पनवेल : वार्ताहर**

मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या आशीर्वादाने अहिल्या बाळाराम नाईक सरपंच यांचे केंद्र पुरस्कार योजना अंतर्गत कामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) रायगड महिला प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



या संदर्भात रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी त्यांना नियुक्तीपत्र दिले. या वेळी अहिल्या नाईक यांचे त्याचे शिवसेनेच्या वतीने व सर्व कार्यकर्त्यांच्या हार्दिक अभिनंदन केले. तसेच बाळाराम कृष्णा नाईक शिवसेना पनवेल तालुकाप्रमुख ग्रामीण उरण विधानसभा क्षेत्र यांनी सांगितले की, खासदार श्रीरंग बारणे यांचा या नियुक्तीमध्ये सिंहाचा वाटा आहे.

# तुपगाव ग्रामपंचायतीतर्फे उंबरखिंड विजय दिन

**चौक : प्रतिनिधी**

स्वतः छत्रपती शिवाजी महाराज ज्या लढाईत सहभागी झाले, त्या उंबरखिंड रणसंग्रामचा ३६४ विजयी दिन ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव यांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी सरपंच रविंद्र कुंभार उपस्थित होते.



२ फेब्रुवारी इ.स.१६६१ला कारतलब खानाच्या नेतृत्वाखाली मुघल सैन्य पुण्याहून निघून लोहगडच्या बाजूने बोर घाटाकडे न जाता घाटमाथ्यावरून उंबरखिंडीच्या दिशेस उतरले. नळीसारख्या बारिक वाटेने मुघल सैन्य सह्याद्री डोंगर उतरत होते. घाट उतरून मुघल सैन्य पुढे उंबरखिंडीत आले. उंबरखिंडच्या घनदाट अरण्यात शिवाजी राजांच्या सैन्याने मुघलांवर बाणांच्या वर्षावाने व तोफांच्या गोळ्यांनी हल्ला करून मुघल सैन्याचे मराठा सैन्याकडून प्रचंड हाल केले. पराभव दिसत असताना रायबाघण यांच्या सल्लावरून कारतलब खानाने तह करण्यासाठी शिवाजी राजांकडे दूत पाठवला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी जसे आलात तसे परत जा, असा आदेश दिला. या लढाईत स्वतः छत्रपती शिवाजी महाराज सामील होते,तर सर नौबत नेताजी पालकर यांच्या नेतृत्वाने ही लढाई एकही मावळ्यांचे रक्त न सांडता झाली.

नेताजी पालकर यांचे जन्म गाव चौक असल्याने दर २ फेब्रुवारी या दिवशी या उंबरखिंड रण संग्रामचा जल्लोष साजरा केला जातो. सरपंच रवींद्र कुंभार, उपसरपंच सुयोग भालेकर, सचिन साखरे, निलेश मोरे, रोहिणी गुरव, सपना गुरव, कांता नागावकर, स्वाती जाधव, शरीफ भालदार, अश्विनी मोरे, ग्रामपंचायत अधिकारी सचिन कुराडे यांच्यासह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवी मुंबईत बालरंगभूमी परिषदेच्या शाखेचे उद्‌घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

बालरंगभूमीशी संबंधित सर्व संस्था, कलावंत, बालकलाकार व बालप्रेक्षकांच्या हितासाठी 'बालरंगभूमी परिषद' कार्यरत आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद संलग्न असणाऱ्या या परिषदेच्या राज्यभरात २६ शाखा कार्यरत असून नवी मुंबईत स्थापन झालेल्या २७ व्या शाखेचे उद्‌घाटन मोठया दिमाखात करण्यात आले. बालरंगभूमी परिषदेच्या प्रदेशाध्यक्षा व अभिनेत्री ॲड. नीलम शिर्के-सामंत यांच्या हस्ते आणि शिवसेनेचे नवी मुंबई जिल्हाप्रमुख आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे नवी मुंबई विभाग अध्यक्ष विजय चौगुले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.



या वेळी बालरंगभूमी परिषदेचे नवी मुंबई अध्यक्ष शुभम चौगुले, जेष्ठ नाटयकर्मी रवी वाडकर व रवींद्र औटी, अभिनेता प्रशांत मेंगडे, नवनिर्वाचित बालरंगभूमी उपाध्यक्ष प्रशांत निगडे, सचिव सचिन पवार, खजिनदार निखिल औटी, सदानंद गोळे, पंकज भोसले, विशाल महाडीक, पालिकेचे माजी विरोधीपक्षनेते मनोज हळदणकर त्याचप्रमाणे नाट्यरसिक तसेच बाल नाट्य कलाकार उपस्थित होते.

बालरंगभूमी परिषदेची स्थापना जून २०१८ मध्ये झाली आहे. राज्यभरात बालनाट्य परिषद प्रमाणे फक्त नाट्य क्षेत्राशी संबंधित नसून नृत्य, गायन, वादन, जादू इत्यादी कला प्रकाराच्या प्रसारासाठी कलाशिक्षण बालकांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी कार्यरत आहे. नवी मुंबईतील २७ व्या शाखेमुळे येथील बालकरांना हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे, असे अध्यक्षा ॲड.नीलम शिर्के-सामंत मार्गदर्शन करताना म्हणाल्या.

नवी मुंबईतून अनेक कलाकार, नाट्यकर्मी, दिग्दर्शक घडले आहेत. बालरंगभूमी परिषदेच्या माध्यमातून भविष्यात देखील बाल कलाकार घडतील, अशा विश्वास अभामपचे नवी मुंबई अध्यक्ष विजय चौगुले यांनी व्यक्त केला.

या वेळी शुभम चौगुले मार्गदर्शन करताना म्हणाले की, अभिनेत्री व बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा ॲड. नीलम शिर्के-सामंत यांच्या माध्यमातून कार्यरत असणार्या परिषदेची नवी मुंबईत २७ वी शाखा सुरु झाल्या बद्दल आनंद होत आहे. नवी मुंबईसह राज्यभरातील बाल कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळाले असून बाल कलाकार घडविले जातील. आगामी कालावधीत बाल कलाकरांसाठी विविध उपक्रम राबविणार असल्याचे चौगुले म्हणाले.

# नांदगावमध्ये नेत्र तपासणी शिबिर

**मुरूड : प्रतिनिधी**

माघी गणेशोत्सवानिमित्ताने नांदगाव ग्रामपंचायतीच्या वतीने मुंबईच्या के.बी.हाजी बच्चुअली धर्मादाय डोळ्यांच्या हॉस्पिटलच्या सौजन्याने स्टॅण्डर्ड चॅटर्ड बँक व साईट सेव्हन इंडिया यांच्या प्रायोजकत्वातून गोरगरीब व गरजूंसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



शिबिराचे उद्‌घाटन नांदगावच्या सरपंच सेजलताई घुमकर यांच्या हस्ते व उपसरपंच मेघा माजगावकर, माजी उपसरपंच अस्लमभाई हलडे, नरेश कुबल, सुदेश घुमकर, सदस्य उदय थळे, विक्रांत कुबल, जयेंद्र चोरघे, महेश माजगावकर, विरेंद्र देऊळकर, नितेश रावजी, चंद्रकांत देऊळकर, बाळू मालवणकर, सदस्य अमिषा पाटील, विजयश्री रावजी, वैशाली रणदिवे, जितेंद्र दिवेकर, विशाल पाटील मंजुम घोले, वैशाली पवार आदींच्या उपस्थित झाले.

रुग्णालयाचे समाजसेवा विभागाचे प्रमुख अशोक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पाधिकारी सचिन मोरे, रेवदंडा व्हिजन सेंटरच्या संध्या प्रसाद, सचिन पोटफोडे, समिधा शेणवईकर, गौरव गायकवाड, आकाश चाळके, सौमित्री चकरीव कल्पीत कोळी या वैद्यकीय टीमने रुग्णांची संगणकावर मोफत तपासणी केली व चष्म्यांचे वाटप केले.

# स्पर्श अभियानास सामूहिक प्रतिज्ञेने प्रारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त ३० जानेवारी पासून १३ फेब्रुवारीपर्यंत 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान २०२५ अंतर्गत शासनाच्या आरोग्यसेवा संचालनालयामार्फत विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महापालिका आरोग्य विभागानेही विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे.

आरोग्य शिक्षण पंधरवड्यास सुरुवात होत असताना शासन निर्देशानुसार कुष्ठरोगाबाबत एकत्रितपणे जनजागृती वाढवूया व कुष्ठरोगाबाबतचा गैरसमज दूर करुन कुष्ठरोगाने बाधित एकही व्यक्ती मागे राहणार नाही याची दक्षता घेऊ असे घोषवाक्य शासनामार्फत जाहीर करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने शासनामार्फत प्राप्त स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानाची सामुहिक प्रतिज्ञा महापालिका मुख्यालयातील म्फीथिएटर येथे झाली. या प्रतिज्ञेमध्ये - कुष्ठरोगाचे संशयित लक्षण असलेल्या व्यक्तीला जवळच्या आरोग्य केंद्रामध्ये जाण्यास प्रेरित करेन व त्यांना कुष्ठरोग असेल तर पूर्ण उपचार मिळावे यासाठी मदत करण्याची दक्षता घेईन, असा आशय असून समाजामध्ये कोणी कुष्ठरोगी असेल तर मी त्याच्या सोबत बसणे, खाणे, फिरणे यामध्ये कुठल्याही प्रकारचा भेदभाव करणार नाही. तसेच कुष्ठरोग पिडीत व्यक्तीसोबत सामाजिक भेदभाव होणार नाही यासाठी प्रयत्नशील राहून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या संकल्पनेतील कुष्ठरोगमुक्त भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहील, अशी प्रतिज्ञा सर्वांनी सामुहिकरित्या ग्रहण केली.



# इमारतींच्या टेरेसवर फुलवली फळबाग

**पनवेल : दादाराम मिसाळ**

कळंबोली गावात आपल्या घराच्या टेरेसवर फळबाग फुलवून निसर्गप्रेमी तरुणाने एक आदर्श निर्माण केला आहे. किरण मोहिते या तरुणाने विविध झाडांचे संगोपन करून फळझाडे फुलवली आहेत. विशेष म्हणजे या झाडांना फळेदेखील आली आहेत.

फळबागेमध्ये विविध फळझाडे लावण्यात आली असून, आता वेगवेगळ्या प्रजातींची फुलपाखरेसुद्धा फळबागेकडे फिरकू लागली आहेत. २४ महिन्यांच्या प्रयत्नाने विविध प्रकारच्या फळझाडांची लागवड केल्याने वेगवेगळ्या प्रजातींची फुलपाखरे फळबागेकडे आकर्षित होऊ लागली आहेत. घराच्या टेरेसवर फळबाग तयार करणारे पर्यावरणप्रेमी किरण मोहिते हा तरुण पनवेल महानगरपालिकेत लिपिक म्हणुन कार्यरत आहे. दोन वर्षांपूर्वी फळांची बाग तयार करायला सुरुवात केली. यात हापूस, चिकु, पेरू आदींसह फुलझाडांचा समावेश आहे. पेरूचे आणि आंब्याची चार ते पाच प्रकारांची झाडे फळझाडे बागेमध्ये लावण्यात आली आहेत, असेही किरण मोहिते यांनी सांगितले. लाइम बटरफ्लाय, क्रिमसॉन रोज तसेच विविध प्रजातीचे रंगीबेरंगी फुलपाखरे या फळबागेत वावरत असतात.

शहरातील विकास प्रकल्पांमुळे झाडांची कत्तल होतेय. परिणामी, झाडांची संख्या कमी होऊन वातावरणातील हवा दूषित होत आहे, मात्र आपल्या परिसरातील मोकळ्या जागेत झाडे लावली तर त्याचा फायदा माणसाला नक्कीच होणार आहे. झाडे हवेतील प्रदूषण कमी करून, शुद्ध हवा वातावरणात सोडण्याचे काम करते, असेही किरण मोहिते यांनी सांगितले.

आपल्या कामाचे नियोजन करून या झाडांना वेळेत पाणी देण्याचे काम किरण करतो. या झाडांना चिकू, पेरू तसेच आंबेदेखील आल्याने विनाखताची ही फळे आहेत.





**उरण : माघी गणेशोत्स्वानिमित्त गणपती चौक येथील मंदिरात भक्तांची गर्दी होती.**

**दुखवटा**

## वसंत यादव

**माणगाव :** शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्था तालुका माणगावचे सहसचिव उमेश यादव यांचे पिताश्री वसंत यशवंत यादव यांचे शुक्रवारी (दि.३१) पाली-सुधागड तालुक्यातील चिवे मूळगावी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, एक मुलगी, एक सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कै. वसंत यादव हे शांत व सय्यमी स्वभावाचे व्यक्तिमत्व होते. त्यांच्यावर चिवे गावातील स्मशानभूमीत अंत्य संस्कार करण्यात आले. या वेळी मोठा जनसमुदाय अंत्यविधीला उपस्थित होता.



## निवडक

### तरुणी हरविल्याची तक्रार



**पनवेल :** हॉस्पिटलमध्ये कामाला जाते असे सांगून घराबाहेर पडलेली एक तरुणी अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मनस्वी काडली (वय १९, रा.करंजाडे) असे या तरुणीचे नाव असून तिची उंची ५ फुट २ इंच, बांधा मध्यम, रंग गोरा, चेहरा उभट, केस काळे, नाक सरळ असून अंगात काळा टी-शर्ट व काळी लेगिझ घातलेली आहे. तिला तेलगु, हिंदी भाषा अवगत आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (८५९१४२४३५०) किंवा हवालदार देवेंद्र म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### आदई येथे घरफोडी

**पनवेल :** चोरट्यांनी आदई गावातील बालाजी स्प्लेंडर इमारतीतील घरामध्ये प्रवेश करून कपाटातील सोने, चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेले. याप्रकरणी चोराविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बालाजी स्प्लेंडर इमारतीतील रहिवासी यांनी घराचा लोखंडी दरवाजा उघडला असता लाकडी दरवाजाची कडी तोडण्यात आला होती. या वेळी घरात जाऊन पाहिले असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. लोखंडी कपाट आणि लाकडी कपाट उघडे दिसून आले. या वेळी कपाटात ठेवलेले सोने आणि चांदीचे दागिने, रोख रक्कम आढळून आली नाही. चोरांनी जवळपास तीन लाखांचा ऐवज चोरून नेला.

### संजीव पाटील सेवानिवृत्त

**उरण :** तालुक्यातील पाणदिवे गावचे सुपुत्र संजीव सदाशिव पाटील हे मागील २६ वर्ष विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे देणाऱ्या जनरल एज्युकेशन संस्थेच्या कै. गोपाळ नारायण अक्षीकर विद्या संकुल उरण या माध्यमिक शाळेत सहाय्यक शिक्षक पदावर नियत वयोमानानुसार नुकतीच सेवेतून निवृत्त झाल्यामुळे, त्यांचा निवृत्ती सेवापूर्ती सोहळा नुकताच एन. आय. विद्या संकुलनात झाला. सत्कारमूर्ती संजीव पाटील यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, एक ग्रॅम सोन्याचे नाणे तसेच सहचारिणी संपदा पाटील यांना साडीचोळीचा मान देऊन शाळेच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला.



# पनवेल येथे तिसरे केमोथेरपी सेंटर







## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉ. पुष्पक चिरमाडे यांच्या माध्यमातून ठाणे, वाशी आणि नंतर पनवेल येथे केमोथेरपीचे तिसरे सेंटर रविवारी (दि.२) सुरू झाले आहे. या सेंटरचे उद्घाटन पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले.

केमोथेरपी सेंटरच्या माध्यमातून पनवेल आणि परिसरामधल्या दुर्दैवाने कॅन्सर झालेला आहे अशा पेशंटच्या साठी केमोथेरपी इतर ठिकाणी मिळते त्या पैक्षा कमी दरात उपलब्ध होणार आहे. त्यांच्या या सर्व कार्याला शुभेच्छा देतो आपल्या सर्वांच्या दृष्टिकोनातून कॅन्सर सारखा रोग हा आता खूपच आपल्या अवतीभवती दृष्यमान झालेला आहे अशा वेळी याच्याशी झुंजायचं लढयाच तर केवळ दुःखी होऊन किंवा व्यथित होऊन आपण त्याचा सामना करू शकणार नाही तर आलेल्या परिस्थितीचा धिराने सामना करायचा तर त्यासाठी अशा पद्धतीचे पर्याय जे समाजामध्ये उपलब्ध आहेत त्यांचा शोध घेणे ही आवश्यक आहे, असे मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी या सेंटरच्या उद्घाटनावेळी केले.

या उद्घाटनाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल महापालिकेचे माजी सभापती डॉ. अरुणकुमार भगत आदी उपस्थित होते.

## शिवाजीनगर येथे बाळकृष्ण माऊलींवर पुष्पवृष्टी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री समर्थ सद्गुरु माऊली गिरीमल्लेश्वर महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री बाळकृष्ण माऊली यांच्या वर पुष्पवृष्टी रविवारी (दि.२) करण्यात आली. त्यानिमित्त शिवाजीनगर येथे माऊलीच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम झाले.



देव साधक सामाज संचालित न्हावा, न्हावेखाडी, गव्हाण, कोपर, शिवाजीनगर, लोकनेते रामशेठ ठाकूर परिवार आणि ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आल होते. दरम्यान, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुण्यतिथीनिमित्त दर्शन घेतले.

या वेळी अरुणशेठ ठाकूर, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, अरुण घरत, रमण ठाकूर, भूपेश कडू, शिवाजी ठाकूर, जे.के. ठाकूर, कीर्तन मोकल, गणपत ठाकूर, पद्माकर ठाकूर आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## लोकनेते दि.बा. पाटील यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सन्मान सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



प्रकल्पग्रस्तांचे झुंजार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम रायगड जिल्ह्यात होत आहेत. असाच एक सन्मान सोहळा एकविरा कला क्रीडा सामाजिक आणि शैक्षणिक संस्था पनवेल आणि बी.के. पाटील फाउंडेशन केळवणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आला होता.

कामोठे येथील कराडी समाज मंडळ हॉलमध्ये हा सन्मान सोहळा झाला. विविध क्षेत्रांमध्ये नावलौकिक मिळवलेल्या आणि आपल्या कार्याची चुणूक दाखवलेल्या सन्माननीय व्यक्तींचा या वेळी सत्कार करण्यात आला. यामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह अनेकांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला भाजपचे कामोठे शहराध्यक्ष रवी जोशी, माजी नगरसेवक विकास घरत, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष वनिता पाटील, अर्थतज्ञ जे.डी तांडेल, हभप प्रकाश पाटील, तेजस पाटील उपस्थित होते.

तेजस पाटील हे नेहमी वेगवेगळे उपक्रम राबवत असतात आज त्यांनी सन्मान सोहळ्याचा आयोजन कामोठ्यात केले या कार्यक्रमाचा मी कौतुक करतो. आपली संस्था आणि त्याचबरोबर संस्थेत काम करणारे सदस्य यांनी आणखीन उंच भरारी घेऊन वेगवेगळे उपक्रम समाजासाठी राबवावे. त्यांच्या संस्थेला कोणतीही गरज लागेल, त्यासाठी मी या पनवेल मतदारसंघाचा आमदार म्हणून आपल्यासोबत नेहमी राहीन, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी या कार्यक्रमादरम्यान केले.



**पनवेल : माघी गणेशोत्सवानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तालुक्यातील न्हावेखाडी येथील गणपती मंदिरात जाऊन दर्शन घेतले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, नरेश मोकल, माजी ग्रामपंचायत सदस्य सावळाराम मोकल तसेच सी.एल. ठाकूर, राम मोकल, सुधीर मोकल, सतिश ठाकूर, सुजित ठाकूर आदी उपस्थित होते.**




**पनवेल : माघी गणेश उत्सवानिमित्त नवीन पनवेल येथे वक्रतुंड मित्र मंडळाच्या विराजमान गणरायाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, भाविक उपस्थित होते.**

## इस्कॉन मंदिरात भाविकांचा ओघ

**खारघर : प्रतिनिधी**

खारघर मध्ये काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या इस्कॉन मंदिरात भाविकांच्या रांगा लागल्या आहेत. शनिवार रविवार सुट्टीच्या दिवशी खारघरमधील इस्कॉन मंदिरात लाखो भाविक आपली हजेरी लावतात. उदघाटनापासून जवळपास दहा लाख भाविकांनी मंदिराला भेट दिली आहे. यामुळे खारघर स्टेशन ते पांडव मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ वाढली असुन स्थानिक रिक्षाचालकांनादेखील एक रोजगाराची संधी वाढली आहे.

शंभर कोटीपेक्षा जास्त रुपये खर्चून उभारलेला खारघर इस्कॉन मंदीर हा आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा इस्कॉन मंदिर आहे.दहा एकरात हे मंदिर पसरले आहे. रविवारी प्रजासत्ताक दिनापासून मोठ्या प्रमाणात भाविकांनी या मंदिराला भेट देण्यास सुरुवात केली आहे. सुट्टीच्या दिवशी मंदिरात मोठी गर्दी होते.खारघर शहरात सेंट्रल पार्क हे आत्ता पर्यंतचे सर्वात मोठे आकर्षण राहिलेले शहरातील पर्यटन स्थळ राहिले आहे. त्या पाथोपाठ याच परिसरात इस्कॉन मंदिर उभे राहिल्याने शहरात एक नवीन पर्यटन स्थळ मिळाले आहे.



**रिक्षाचालकांना उत्पन्न**

**पांडव मार्गावर इस्कॉन मंदिरात येण्यासाठी खारघर रेल्वे स्थानकातून रिक्षा पकडून मंदिर गाठता येते.यामुळे भाविकांचा मंदिरात येण्याचा कळ वाढल्याने स्थानिक रिक्षा चालकांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.**

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, कल्याण, नवी मुंबई, पनवेल आदी ठिकाणाहून भाविक मंदिरात आले होते. भव्य मंदिर, उद्यान परिसर तसेच येथील आकर्षक लायब्ररी हे पर्यटकांना आकर्षित करीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मंदिराचे उदघाटन झाल्याने देशभरात या मंदिराची ख्याती पोहचली आहे.त्यामुळे पर्यटकांचा ओढा वाढला आहे. उदघाटनापासून पाच लाखांपेक्षा जास्त भाविकांनी इस्कॉन ला भेट दिली सून शनिवार, रविवारी हि गर्दी मोठ्या प्रमाणात असते.

> **गेल्या दिवसांत दोन लाख भाविकांनी मंदिराला भेट दिली आहे. आम्ही सर्व भाविकांचे स्वागत करतो.**
>
> **– सुरदास प्रभु, अध्यक्ष, इस्कॉन मंदिर खारघर**

## शांतीनिकेतन स्कूलचे स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शांतिनिकेतन पब्लिक स्कूल, नवीन पनवेल सेक्टर २ येथे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांची कला कौशल्य सादर करून उपस्थितांची मन जिंकली.

३० आणि ३१ जानेवारी या दोन दिवशी शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन नविन पनवेलमध्ये साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी न्यू जय भारत शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा पूनम पवार, आमदार प्रशांत ठाकूर, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेवक संतोष शेट्टी हे त्यांच्या पत्नीसमवेत उपस्थित होते.

माजी नगरसेविका राजश्री वावेकर, स्मिता ढाकणे वरिष्ठ पोलिस निरीक्षक खांदेश्वर पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस निरीक्षक बलवंत पाटील, यकूब अन्सारी उपस्थित होते. या मान्यवरांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. सीमाव पैकर यांनी केले. शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेला वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा हा शैक्षणिक उत्कृष्टतेचा आणि कठोर परिश्रमांचा भव्य उत्सव होता. विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या विविध कलागुणांचे दर्शन करत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमाला शेकडो पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कला गुण व सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली.




## उरण महाविद्यालयात हक्क व अधिकार क्षमतेवर कार्यशाळा



**उरण : रामप्रहर वृत्त**

कोंकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाचा वाणिज्य विभाग, पीएच. डी..विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.१) आय पी आर: पेटंट, कॉपीराईट व ट्रेडमार्क या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. कार्यशाळेकरीता प्रा. राजीव मिश्रा, रत्नम कॉलेज, भांडुप, मुंबई, हे साधन व्यकी म्हणून मार्गदर्शन करण्याकरिता उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. एम.जी. लोणे यांनी प्रा. राजीव मिश्रा यांचे यथोचित स्वागत केले. ह्या कार्यक्रमाचा उद्देश प्राचार्य डॉ. एम .जी. लोणे यांनी सांगितला. जागतिकीकरणाच्या युगात मानवी बुद्धीलाअतिशय महत्व आहे. मानवाकडून जे नवीन निर्माण केले जाते, ज्याचा नाविन्य पूर्ण शोध घेतला जातो त्याचे संरक्षण केले पाहिजे, अर्थात तो मानवाचा हक्क आहे. इतर कुणीही दुसऱ्याच्या बुद्धिमत्तेचा गैरवापर करू नये याची काळजी घेतली पाहिजे..यासाठी पेटंट साठी अर्ज कसा करावा?, त्याची कार्यपद्धत कशी आहे?, त्याचे संशोधकाला नक्की काय फायदे आहेत? याची विस्तृत माहिती विविध उदाहरणाद्वारे दिली.

या कार्यशाळेकरिता महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी तसेच प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. प्रा. हंनात शेख यांनी साधन व्यक्तीनं चे आभार मानले. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. अरुण चव्हाण, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. विनोद इंदुलकर, वाणिज्य विभाग प्रमुख आणि प्रा. डॉ. पराग कारुळकर यांनी केले.

## संपादकीय


# अर्थभान जपणारे बजेट

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात असलेल्या सरकारमधील अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संतुलित अर्थसंकल्प सादर करून मध्यमवर्गीयांना दिलासा दिला आहे. या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, युवा, वृद्ध अशा सर्व घटकांचा तसेच विविध क्षेत्रांचा विचार करण्यात आला आहे.

**मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील दुसरा अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शनिवारी सादर केला. त्यांचे हे आठवे अर्थसंकल्पीय भाषण होते. या अर्थसंकल्पात सर्वसामान्यांसाठी विशेष घोषणा होणार याचे संकेत आधीच पंतप्रधान मोदी यांनी 'मी लक्ष्मीमातेकडे प्रार्थना करतो की, देशातील गरीब व मध्यमवर्गावर तिची कृपादृष्टी राहो', असे म्हणत दिले होते. वास्तविक भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत म्हणजेच २०४७पर्यंत देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचे ध्येय केंद्रातील मोदी सरकारचे आहे. त्यानुसार सरकार मिशन मोडवर काम करीत आहे. देशातील जनतेने सलग तिसऱ्यांदा काम करण्याची संधी पंतप्रधान मोदी व सहकाऱ्यांना दिली आहे. त्यामुळे या वेळच्या अर्थसंकल्पात काही तरी विशेष असणार याची कल्पना आली होती, परंतु अपेक्षेपेक्षा जास्त सुखद धक्का विविध घोषणा करून देण्यात आला. यापैकी १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा तर सर्वात मोठी आहे. यामुळे नोकरदारवर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे. या संदर्भातील आयकर विधेयक पुढील आठवड्यात संसदेत मांडले जाईल. त्या वेळी याबाबत अधिक स्पष्टता येईल. देशातील अन्नदाता शेतकऱ्यांसाठी पंतप्रधान धनधान्य कृषी योजना राबवणार असल्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली आहे. राज्यांच्या सहाय्याने ही योजना राबवण्यात येणार असून यामध्ये १०० जिल्ह्यांवर विशेष लक्ष देण्यात येईल. तब्बल १.७ कोटी शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ होणार आहे. त्याचप्रमाणे किसान क्रेडिट कार्डची मर्यादा वाढवण्यात आली आहे, जी तीन लाखांवरून पाच लाख करण्यात आली आहे. महिलांच्या उन्नतीसाठी अर्थसंकल्पात लक्ष पुरविण्यात आले असून पहिल्यांदाच व्यवसाय करणाऱ्या पाच लाख महिला, अनुसूचित जाती आणि जमाती उद्योजकांना सरकार दोन कोटी रुपयांचे कर्ज देणार आहे. महिलांना स्टार्टअपसाठी सरकार १० हजार कोटी रुपयांचा निधी देणार आहे. याशिवाय महिलांना उद्योग वाढवण्यासाठी डिजिटल ट्रेनिंग, मार्केटिंग सपोर्ट आणि सरकारी योजनांची जोडण्याची संधी दिली जाणार आहे. कोरोनापासून आरोग्याबाबत सर्वांची सजगता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये २०० डे केअर सेंटर उघडले जातील; त्याचबरोबर प्रत्येक जिल्ह्यामध्ये कॅन्सर सेंटर सुरू केली जाणार आहेत. याखेरिज जीवनरक्षक औषधांच्या किमती कमी होतील, ज्यामध्ये ३६ औषधांचा समावेश आहे. पूर्वी अर्थसंकल्प आणि रेल्वे बजेट स्वतंत्र सादर केले जात असत. अलिकडे दोन्ही एकत्रच मांडले जातात. अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या वार्षिक २०२५च्या बजेटमध्ये रेल्वे मंत्रालयासाठी एक लाख ३८ हजार कोटींची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पातून महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी तब्बल ६६४० कोटी रुपयांची तरदूत करण्यात आल्याचे दिसून येते. केंद्रीय अर्थसंकल्पामधून पर्यटन क्षेत्रासाठीही महत्त्वाचे निर्णय घेतले गेले आहेत, ज्यामध्ये सरकारकडून ५० नवी पर्यटनस्थळे विकसित केली जाणार आहेत. अशा प्रकारे मोदी सरकार सर्व देशाच्या प्रगतीसाठी सर्व बाजूंनी विचार करीत असून अर्थसंकल्पात त्याचे प्रतिबिंब उमटले आहे.**

# कर्जतमधील शंभर वर्षांपासूनचा मिरची बाजार





**खबरबात**
**विजय मांडे**

कर्जत बटाटावडा, पावसाळी पर्यटनासाठी धबधब्यांचे गाव आणि आता कर्जत शिक्षण पंढरीकडे वाटचाल करतेय; त्याचबरोबर कर्जत मिरची बाजारासाठीही प्रसिद्ध आहे. रायगडच नव्हे तर ठाणे, पुणे, मुंबईहूनसुद्धा या बाजारात वर्षानुवर्षे ग्राहक येतात आणि आपल्या आवडीची मिरची व खडे मसाले खरेदी करतात. विशेष म्हणजे परदेशात असलेल्या आपल्या नातेवाईकांनादेखील कर्जतची मिरची घेऊन तयार मसाला पाठवणाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे. या मिरची बाजाराला शंभर वर्षे होत आली आहेत. गेल्या वर्षी ग्राहकांना मिरचीचा थोडा ठसका बसला होता. यंदा मिरचीचे दर कमी असल्याने गृहिणींनी मिरची खरेदी करताना हात सैल सोडला आहे.

सुमारे नव्वद-पंचाण्णव वर्षांपासून कर्जतचा मिरची बाजार भरतोय. महावीर पेठेत १०-१२ दुकानांमध्ये मिरची व खडे मसाले विक्रीसाठी असतात. ही मिरची हैदराबादमधील वारंगल, आंध्र प्रदेशातील गंटूर, तेलंगणा आदी राज्यातून पुण्यात येते आणि तेथून ती कर्जतच्या बाजारात उपलब्ध होते. हल्ली तयार मसाले मिळत असले तरी पहिल्यापासून ज्यांना कर्जतच्या मसाल्याची सवय आहे ते वर्षभरासाठी मसाला करण्यासाठी कर्जतची बाजारपेठ गाठतात तसेच ग्रामीण भागात लग्न सोहळ्यासाठी भोजनाचा आस्वाद चांगला चाखायला मिळावा म्हणून २० ते २५ किलो मसाला करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. खरा हा बाजार चार ते पाच महिनेच असतो आणि सुमारे दोन कोटी रुपयांची उलाढाल होत असते.

जानेवारी ते मे या कालावधीत ही मिरची विकत घेण्यासाठी अगदी पेण, अलिबाग, पनवेल, बदलापूर, कल्याण, डोंबिवली, मुरबाड, शहापूर, लोणावळा, पुणे येथूनच नव्हे; तर मुंबईतूनही ग्राहक येत असतात. परदेशातही आपल्या नातेवाईकांना कर्जत मधून मिरची घेऊन मसाला तयार करून पाठवण्याचे प्रमाणही लक्षणीय आहे. यंदा किमती बऱ्यापैकी असल्याने मिरची घेण्यासाठी मिरची व खडे मसाले घेण्यासाठी बहुतांश दुकानात ग्राहकांची गर्दी दिसते. मिरची सहा-सात प्रकारची असते. जयंतीलाल परमार, मदन परमार, शिवलाल गुप्ता हे तीन-चार पिढ्यांपासून हा मिरचीचा व्यापार करतात. काही छोटे व्यावसायिक हातगाडीवरही हा व्यवसाय करतात. हा व्यवसाय हंगामात दोन कोटी रुपयांपर्यंत जातो.

कर्जतमध्ये मसाला दळण्याच्या मोजक्याच गिरण्या आहेत. तर तीन-चार ठिकाणी दणकी पद्धतीने मसाला कुटून दिला जातो. या पद्धतीच्या मसाल्याला चांगली चव असते. दहिवली, आमराई आणि दाहिवलीमध्ये या प्रकारच्या दणक्या आहेत. कर्जत व भिसेगाव येथे दगडेंची मसाला गिरणी प्रसिद्ध आहे, तर गुप्ता बंधूंची गिरणीसुद्धा बऱ्याच वर्षांपासून सुरू आहे. वांजळे व सावरगाव याच्या मधोमध ठाकरे यांची मसाला गिरणी आहे. कडावमध्येसुद्धा चांगल्या प्रकारे मिरची दळून दिली जाते. त्या भागातील ग्रामस्थ तेथे मिरची, धणे, हळद करून घेतात. काही मोक्याच्या गावात उदारणार्थ नेरळ, कशेळे, कळंब आदी ठिकाणीसुद्धा मसाला गिरणी आहेत, तर छोट्या गावांमध्येसुद्धा मिरची दळून दिली जाते.

यंदा मिरचीचे दर कमी असल्याने अनेक गृहिणींनी मिरची विकत घेताना काटकसर केली आहे. खड्या मसाल्याचे दर स्थिर असल्याने गृहिणींनी हात सैल सोडला आहे. दररोज जेवणात मसाला वापरावा लागत असल्याने मिरचीच्या दरात वाढ झाल्याने नाईलाजाने मिरची खरेदी करण्याची वेळ ग्राहकांवर येत असते. गेल्या वर्षी मिरचीचे दर आवाक्यात होते. त्यामुळे गृहिणींचे आर्थिक गणित जुळले होते. यंदा मिरचीचे दर आणखी कमी झाल्याने व्यापारी वर्गाचा व्यवसाय चांगला होत आहे, असे व्यापारीवर्गाचे म्हणणे आहे.

**मिरची प्रतिकिलो दर**

| | गतवर्षी | यंदा |
|---|---|---|
| गंटूर मिरची | २४० रु. | १८० रु. |
| लवंगी मिरची | २२० रु. | २५० रु. |
| बेडगी मिरची | ३५०-४५० रु. | २०० ते २३० रु. |
| काश्मिरी मिरची | ३५०-५५० रु. | ३५० ते ४०० रु. |
| संकेश्वरी मिरची | २५०-४४० रु. | १८० ते २०० रु. |
| पट्टी मिरची | ३२० रु. | २२० ते २५० रु. |
| सिमला | ४५०-५०० रु. | ३५० ते ४०० रु. |

**खडे मसाले प्रतिकिलो दर**

| | गतवर्षी | यंदा |
|---|---|---|
| धणे | १८०-२०० रुपये | १५० ते २०० रु. |
| हळद | १२०-१८० रुपये | २०० ते २२० रु. |
| बडीशेप | २८० रुपये | २४० रु. |
| दालचिनी | ४०० रुपये | ४०० रु. |
| लवंग | ८०० रुपये | ९०० रु. |
| काळीमिरी | ८०० रुपये | ८०० रु. |
| जावंत्री | २८०० रुपये | २८०० रु. |
| नाकेश्वर २ | ४०० रुपये | २४०० रु. |

## बदलते तंत्रज्ञान

# जिओने लाँच केला स्वस्त रिचार्ज प्लॅन!




ट्रायच्या एका आदेशामुळे टेलिकॉम कंपन्यांची तारांबळ उडाली. फक्त व्हॉइस आणि एसएमएस बेनिफिट्स देणारे प्लॅन्स सादर करण्याच्या नादात कोणी प्लॅन्स स्वस्त केले कोणी महाग केले, तर कोणी प्लॅन कायमचे बंद करून टाकले. आता रिलायन्स जिओने त्यांचा स्वस्त रिचार्ज प्लॅन गुपचूप सादर केला आहे, ज्यात तुम्हाला महिनाभर इंटरनेट वापरता येईल. रिलायन्स जिओने भारतात १८९ रुपयांचा एक नवीन प्रीपेड प्लॅन भारतात लॉन्च केला आहे. १८९ रुपयांमध्ये जिओ तुम्हाला व्हॉईस आणि डेटाचा फायदा घेण्याची संधी देतो आहे. काही ऑनलाइन असे अहवाल सूचित करतात की, जिओकडे १८९ रुपयांचा प्लॅन काही कारणास्तव बंद करण्यात आला होता, जो पुन्हा लाँच केला जात आहे असे म्हटले आहे.

जिओने १८९ रुपयांच्या प्लॅनसाठी एक नवीन टॅब तयार केला आहे ज्याला affordable pack म्हणून वर्गीकरण केले आहे. १८९ रुपयांचा हा प्लॅन २ जीबी लंपसम डेटा ऑफर करते. म्हणजेच तुम्हाला २८ दिवसांच्या वैधतेसह एकूण २ जीबी हाय-स्पीड ४ जी डेटा देतो. या प्लॅनवर ५जी उपलब्ध नाही.

१८९ रुपयांचा प्रीपेड प्लॅन २८ दिवसांच्या कालावधीसाठी अमर्यादित व्हॉइस कॉलिंग, ३०० एसएमएस आणि दोन जीबी डेटासह येतो. १९८ रुपयांमध्ये, जिओ १४ दिवसांच्या कालावधीसाठी अमर्यादित ५ जी आणि जिओ सावन प्रोसारखे ओटीटी फायदे तर प्रतिदिन दोन जीबी हाय-स्पीड डेटा ऑफर करते आहे.

हा प्लॅन अशा वेळी लाँच करण्यात आला जेव्हा अशी अफवा पसरली की, जिओ त्याच्या व्हॉइस, एसएमएस प्लॅनवर डेटाला परवानगी देत नाही या गोंधळामुळे यामुळे जिओला अनेक प्रतिक्रियांचा सामना करावा लागला, जिओने Financialexpress.comला पुष्टी केली आहे की, नवीन ४४८ आणि १७४७ रुपयांच्या प्लॅनचे सदस्यत्व घेणारे ग्राहक डेटा पॅकसह रिचार्ज करू शकतात. हे डेटा पॅक, जसे की ११ रुपये, १९ रुपये आणि २९ रुपये किंमतीचे, सर्व जिओ रिचार्ज चॅनेलद्वारे उपलब्ध आहेत.

# आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक



**निमित्त**

देशावर इंग्रजांची जुलमी राजवट असताना रयतेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सगळ्याच जाती-जमातींनी संघर्ष केला. या सर्वांमध्ये ब्रिटिश काळात क्रांतीची मशाल पेटवली ते आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक यांनी! स्मृतीदिनानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी...

उमाजींचा जन्म पुणे जिल्ह्यात पुरंदर तालुक्यातील भिवडी या गावी ७ सप्टेंबर १७९९ रोजी रोजी झाला. दादोजी खोमणे आणि लक्ष्मीबाई हे त्यांचे आई-वडील होते. जेजुरीचे मल्हारी मार्तंड खंडोबा हे नाईक यांचे आराध्य दैवत होते. याच ठिकाणावरून त्यांनी इंग्रजांविरुद्ध क्रांतीचा वणवा पेटवला.

१८२१ साली झालेल्या रामोशी समाजाचा इंग्रजांविरुद्ध पहिला उठाव होता. या लढ्याचे नेतृत्व उमाजीनी केले. देशव्यापी क्रांतीचे स्वप्न पाहणारा इंग्रजांना सळो की पळो करून सोडणारा निधड्या छातीचा वीर आद्यक्रांतीकारक म्हणजेच उमाजी नाईक. महाराष्ट्रातील रामोशी समाजाची वस्ती ही डोंगरकपारीत असायची. त्या वेळी पुणे, सातारा जिल्ह्यात त्यांची सतरा-अठरा हजार लोकसंख्या असावी, पण या परिसराच्या संसर्गाने लोखंडाचे सुवर्ण बनावे अशी अवस्था या रामोशी समाजाची झालेली पाहायला मिळते. रामोशी समाजाला श्री शिवछत्रपतींचा सहवास मिळाला आणि हिंदवी स्वराज्य स्थापनेत त्यांचा मोलाचा सहभाग होता. शिवकाळात रामोशी समाज हा गावच्या संरक्षणाचे काम करत असे. या समाजाच्या अनेक पिढ्यांनी स्वराज्याचे पाईक म्हणून म्हणून काम पाहिले स्वाभाविकच त्यांच्या अंतकरणात स्वातंत्र्याची चेतना धगधगत होती.

२४ फेब्रुवारी १८२४ आली इंग्रजाच्या कंपनी सरकारला भांबुर्डा येथील कडेकोट बंदोबस्तात असणाऱ्या खजिना उमाजीनी आपल्या सशस्त्र साथीदारांच्या मदतीने लुटला. यामध्ये भरपूर ऐवज मिळाला. उमाजींनी इंग्रजाच्या छावण्यांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. त्यांचे खजिना लुटण्याचे सत्र सुरूच राहील्याने इंग्रज त्रस्त झाले.

तत्पूर्वी १८१८मध्ये उमाजी नाईकांना एक वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. या काळात ते लिहायला वाचायला शिकले आणि सुटकेनंतर त्यांनी इंग्रजविरुध्द संघर्ष तीव्र केला उमाजींनी रयतेच्या साथीने इंग्रजाविरुध्द संघर्ष केला. इंग्रजांनी सासवड-पुरंदरच्या मामलेदारास उमाजी नाईकांना पकडण्याचे आदेश काढायला सांगितले. नाईक यांनी पश्चिम महाराष्ट्र कोकण भागात स्वतःचे राज्य घोषित केले. इंग्रजांना पळवून लावण्याचा निर्धार त्यांनी केला. सर्व जाती-जमातीतील लोकांना एकत्र करून व गनिमीकाव्याने धुमाकूळ घालून इंग्रजांपुढे मोठे आव्हान निर्माण केले. पुण्याचा कलेक्टर रॉबर्टसन रामोशाच्या या उठावाबद्दल सर्व जनता कोणत्यातरी राजकीय बदलाची वाट पाहत असल्याचे लिहिले होते.

शेवटी उमाजी नाईकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवत त्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. ३ फेब्रुवारी १८३२ रोजी वयाच्या केवळ ४१व्या वर्षी भारतमातेसाठी उमाजी हसत-हसत फासावर गेले. इतरांना दहशत बसावी या हेतूने तीन दिवस त्यांचे प्रेत पिंपळाच्या झाडाला टांगून ठेवले होते. खुशाबा नाईक व बापूजी सोळकर या उमाजींच्या सहकाऱ्यांनाही फाशी दिली गेली. भारतमातेसाठी बलिदान करणाऱ्या उमाजी नाईकांच्या पवित्र स्मृतीला विनम्र अभिवादन! **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# पाणी कसे व किती प्यावे? जाणून घ्या...



आपल्या सृष्टीत सर्वच जीवांकरिता, वनस्पती विश्वासकट सर्वच प्राणिमात्रांकरिता दैनंदिन जीवनात पाण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शास्त्रकारांनी पाण्याचे महत्त्व 'आश्वासकराणां श्रेष्ठम' असे अत्यंत समर्पकपणे वर्णन केले आहे. आपणाला जगायचे असेल तर किमान तीन मूलभूत गरजा- हवा, पाणी व अन्न आवश्यक असते. एकवेळ अन्न नसले तरी चालते, पण तुम्हा-आम्हाला प्यायला पाणी हवेच. शास्त्रकारांनी या द्रवद्रव्याचा फार बारकाईने विचार केला आहे. अष्टांगहृदयकार वाग्भटाचार्य सू.अ. ५ मध्ये 'आकाशात पतितं तोयम्;' आकाशात पडणाऱ्या पाण्याचे, अंतरिक्ष जगाचे विस्ताराने वर्णन केले आहे. जगभर मानवी जीवनाला शुद्धच पाणी मिळावे म्हणून पाणी शुद्ध करण्याचे, शुद्धच पाणी पुरवठ्याचे २४ तास प्रयत्न चालू असतात.

शरद ऋतूमध्ये आकाश स्वच्छ असते. वातावरणात धूळ अजिबात नसते. या काळातील पावसाचे पाणी हे सर्वात शुद्ध जल होय. त्याला 'अमृतजल' अशी संज्ञा आहे. ज्यांच्या निवासात, गच्चीत किंवा उंच इमारतीत टेरेसवर मोकळी जागा आहे, त्यांनी सप्टेंबर-ऑक्टोबर या काळात मोठ्या भांड्यांना स्वच्छ फडके बांधून ठेवावे. पावसाचे पडणारे पाणी साठवावे. ते कधीही खराब होत नाही. त्यामध्ये किडे, जंतू अजिबात नसतात. पावसाळ्याच्या सुरुवातीच्या काळात हवेत खूपच धुळीचे कण असतात. त्यामुळे जून, जुलै या वर्षा ऋतूच्या काळात पडणाऱ्या पाण्याची व्यवस्थित शुद्धी करूनच ते वापरावे लागते. या पाण्याला आम्लविपाकी पाणी असे संबोधतात. जगभर आमांश, ॲमिबायसिस, पोटदुखी, अतिसार या रोगांनी लोक हैराण असतात. आपल्या प्रजेला सुरक्षित पाणी मिळावे म्हणून सर्वच शासनयंत्रणा आपापल्या परीने प्रयत्न करत असतातच. पण आपल्या स्वास्थ्याकरिता जे पाणी प्यावयाचे ते उकळून गार करून प्यावे हे मी सांगावयास नकोच, पण अशा उकळलेल्या पाण्यात आपल्या अपेक्षेप्रमाणे थोडी सुंठ पूड मिसळून पाणी पिण्याकरिता वापरले तर ते सर्वात आरोग्यदायी पाणी असेल.

सुरक्षित पाण्याचे अंतरिक्ष जल, सुंठ सिद्ध जल, नागरमोथा चूर्णयुक्त पाणी व चुन्याची निवळी यांचे प्रयोग दैनंदिन जीवनात जरूर करा, अनुभवा, अनेक रोगांपासून मुक्ती मिळवा.

## निवडक

### अशोक मोरे यांचा सन्मान



**माणगाव :** शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या माणगाव येथील जे.बी. सावंत एजुकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजचे प्रा. अशोक मोरे यांना महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान व सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअय कट्टा उपक्रमांतर्गत कार्यक्रमात उत्कृष्ठ तालुका समन्वयक पुरस्कार प्राप्त झाल्याने त्यांचा संस्थेतर्फे कार्यवाहक नानासाहेब सावंत व महाविद्यालयीन विकास समिती सदस्य रामदास पुराणिक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या वेळी उपस्थित कॉलेजचे प्रा.डॉ. नितीन मुटकुळे, प्रा.डॉ.जगदीश शिगवण, प्रा.भारत पवार, ग्रंथपाल अमित बाकाडे, दिलीप ढेपे, टेंबे, गायकवाड व विद्यार्थीवर्ग यांनीही प्रा. अशोक मोरे यांचे खास अभिनंदन केले.

### हुतात्मा दिनी अभिवादन



**रेवदंडा :** नेहरू युवा केंद्र, रायगड-अलिबाग आणि ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था, रेवदंडा-अलिबाग-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा दिनाच्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी सामाजिक कार्यकर्त्या तथा माजी सरपंच साक्षी गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. माजी ग्रामपंचायत सदस्या गीता नागोटकर, ओएसिस संस्थेचे संस्थाध्यक्ष प्रतिक कोळी, कार्याध्यक्ष यज्ञेश पाटील आदी उपस्थित होते. जिल्हा युवा समन्वयक निशांत रौतेला यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिक कोळी, सूत्रसंचालन दर्श नागोटकर तर आभार आरूष नागोटकर यांनी मानले.

### बिपीन पाटील सेवानिवृत्त



**नागोठणे :** सुधागड तालुक्यातील परळी येथील कोकण एज्युकेशन सोसायटीचे डॉ. प्रभाकर रामचंद्र गावंड विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक बिपीन महादेव पाटील हे सुमारे ३२ वर्षांचा प्रदीर्घ असा सेवाकाळ पूर्ण करून शुक्रवारी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने त्यांचा सेवापूर्ती सोहळा येथील विद्यालयात आयोजित केला होता. या वेळी कोएसो परळी हायस्कूलचे चेअरमन डॉ. प्रवीण कुंभार, उद्योजक सतीश देसाई, सामाजिक कार्यकर्ते सुनील वाघोस्कर केतन देसाई, रुपेश जाधव, केंद्रप्रमुख हाके, शुभम वाघोस्कर, बबन बोरीटकर, शैलेश गुप्ता, जीपी पाटील, शिक्षक अनिल तिरमले, सुनील कोकळे, मंगेश गिरी; त्याचबरोबरच त्यांच्या सौभाग्यवती प्रिती पाटील, दोन्ही सुपुत्र अनुज व अंकुर अझादी उपस्थित होते.

### मालोजी ढेबे यांना पुरस्कार



**चौक :** सामाजिक कार्यकर्ते मालोजी ढेबे यांना नुकताच पुणे येथील सुसंगत फाऊंडेशन यांनी आदर्श माता-पिता पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. त्यांचा मुलगा एपीआय प्रसाद ढेबे हा कोकण विभागाचे आय.जी.यांचा सहाय्यक म्हणून काम पाहत आहे. मालोजी ढेबे यांना हा पुरस्कार एमकेसीएलचे प्रमुख विवेक सावंत आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये प्रदान करण्यात आला. या वेळी सुसंगत फाउंडेशनचे अध्यक्ष सुधाकर न्हाळदे, सचिव संगीता न्हाळदे आदी उपस्थित होते.

# कोलमांडलामध्ये कांदळवनांची कत्तल

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील कोलमांडला येथील जंगल जेट्टी परिसरात कांदळवन कत्तल करण्यात आली असून, हे काम सध्या रात्रीच्या वेळी गुपचूप सुरू आहे. अनेक दिवसांपासून ही कत्तल चालू असून, त्याठिकाणी भराव कामदेखील सुरू आहे.

काही लोकांचा असा दावा आहे की, काही आर्थिक साटेलोटे घडत असावेत, ज्यामुळे कार्यवाहीला शह दिला जात आहे. कांदळवनाच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्यावर शासनाचे संरक्षण केवल कागदावरच आहे, असे अनेक लोकांचा आरोप आहे. कांदळवन कत्तल केल्यास संबंधित व्यक्तीवर सदोष मनुष्यगुन्हा दाखल करण्याची तरतूद असली तरी, या ठिकाणी नियमांचा उल्लंघन केल्याबद्दल कोणताही ठोस कारवाई का केली जात नाही?



ग्रामपंचायतीच्या हद्दीत जिथे या कत्तल कार्याची सुरूवात झाली आहे, तेथे ग्रामपंचायत गप्प का आहे? या गोष्टीला किती दिवस झाले तरी दोषींना पकडले जात नाही. ज्या व्यक्तींनी भराव काम सुरू केले आहे त्यांच्यावर कारवाई का केली जात नाही? या सर्व मुद्द्यांवर संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधला असता, श्रीवर्धन तालुका कांदळवन संरक्षण अधिकाऱ्यांनी केवळ आरोपी सापडत नाहीत असे तात्त्वर उत्तर दिले.

कांदळवन कत्तल आणि संरक्षणाच्या संदर्भात भारतीय दंडसंहिता कलम २६९ (प्राकृतिक संसाधनांची हानी) आणि पर्यावरण संरक्षण कायद्यातील कलम १५५ तसेच १९७२च्या वन्यजीव संरक्षण कायदा १९७२, कलम ९१ अंतर्गत कायद्यानुसार कत्तल करणाऱ्याला दंड किंवा कारावासाची शिक्षा होऊ शकते. याशिवाय, भारतीय वन अधिनियम १९२७ मध्ये स्पष्टपणे कत्तल करण्यास बंदी घालण्यात आलेली आहे.

या प्रकरणाच्या गहन तपासासाठी प्रशासनाची कडक भूमिका अपेक्षित आहे, परंतु तसे काही होत नाहीये. गृहीत धरून, जेव्हा आरोपी सापडत नाहीत, तर भराव करणाऱ्यांवर कारवाई केली जाते का? का त्या ठिकाणी तात्कालिक कार्यवाही थांबवली जात आहे?

समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या आशयावर आधारित, प्रशासनाने हे प्रकरण अतिशय गांभीर्याने घेऊन तात्काळ तपास सुरू करणे आवश्यक आहे. सर्व दोषींवर कठोर कारवाई होणे ही लोकांची मागणी आहे. प्रशासनाने कानाडोळा करून चालणार नाही. कार्यवाहीनेच हा मुद्दा मार्गी लागेल आणि कायदाचे उल्लंघन करणाऱ्यांना सुसंगत शिक्षा मिळेल, हे समाजाच्या हितासाठी आवश्यक आहे. संपूर्ण प्रकरणावर वरिष्ठांकडून त्वरित लक्ष घालावे.

> **श्रीवर्धन तालुक्यातील बागमांडला जंगल जेट्टी परिसरात कांदळवन कत्तल झाल्याची माहिती समोर आली आहे. आरोपींचा शोध सुरू असला तरी ते अजून सापडलेले नाहीत. या परिसरात आता नवीन झाडे लावण्याची योजना करण्यात आली आहे.**
>
> **-बाळू जगदाळे,** कांदळवन वन कक्ष अधिकारी, श्रीवर्धन

> **श्रीवर्धन कोलमांडला ग्रामपंचायत हद्दीतील कांदळवन ही सरकारी मालमत्ता आहे, जी पर्यावरणाचे संरक्षण करणारी आहे. ती आसपासच्या लोकांच्या फायदेशीर संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण आहे. जर कोणी त्या कांदळवनाची कत्तल केली, तर त्यावर कठोर कारवाई केली जावी, हे अत्यंत आवश्यक आहे.**
>
> **-नितीन जोशी, सरपंच, कोळमांडला ग्रामपंचायत**

# साळावमध्ये सडक सुरक्षा मोहीम




**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील साळाव जेएसडब्लू कंपनीत स्तुत्य उपक्रमाने जानेवारी महिनात सडक सुरक्षा मोहिम राबवित संपन्न झाला.

जानेवारी महिन्यातील सडक सुरक्षा मोहिमेचे शेवटी विशेष कार्यक्रम साळाव जेएसडब्लू कंपनीत घेण्यात आला. या कार्यक्रमास जेएसडब्लू कंपनी युनिट हेड पकंज मलिक, सिक्युरीटी हेड संकाळे, जेएसडब्लू अग्नीक्षामक दलाचे योगेश वासनिक तसेच जेएसडब्लू अग्नीक्षामक दलाचे कर्मचारीवर्ग यांची उपस्थिती होती.

या वेळी रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहा.पोलिस निरिक्षक श्रीकांत किरविले यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रीत करण्यात आले होते. त्याचे समवेत रेवदंडा पोलिस ठाणे ट्रफिक पोलिस महेंद्र खोत व किशोर गुरव यांची उपस्थिती होती. जानेवारी महिन्यात राबविण्यात आलेल्या सडक सुरक्षा मोहिमे अंतर्गत रोड सेप्टी क्युज च्या माध्यमातून मालवाहतुक ट्रक वाहन चालक यांना उपस्थित मान्यवराचे हस्ते बक्षिसे वितरीत करण्यात आली.


कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांचे हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आली, यावेळी उपस्थित मान्यवर, अग्नीक्षामक दल कर्मचारी तसेच उपस्थित मालवाहतुक वाहन चालक यांना सडक सुरक्षा विषयी शपथ देण्यात आली. उपस्थित सहा.पोलिस निरिक्षक श्रीकांत किरविले यांचे स्वागत कंपनी हेड पंकज मलिक यांनी पुष्पगूच्छ प्रदान करून केले. तसेच युनिट हेड पंकज मलिक, सिक्युरीटी हेड संकाळे, जेएसडब्लू अग्नीक्षामक दलाचे योगेश वासनिक यांचेही स्वागत साळाव जेएसडब्लू अग्नीक्षामक दलाचे वतीने करण्यात आले. उपस्थित मान्यवर सहाय्यक पो.नि. श्रीकांत किरविले व कंपनी हेड पंकज मलिक यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# विद्या विकास मंदिर शाळेला जिल्हास्तरीय पुरस्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षा सप्ताह २०२५ अंतर्गत रायगड जिल्हा पोलीसांच्या वतीने 'माझी शाळा सुरक्षित शाळा' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये रायगड जिल्ह्यातून ५०० शाळांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यातून फक्त २८ शाळांची निवड करण्यात आली. या पुरस्काराच्या शर्यतीत कर्जत महिला मंडळाचे विद्या विकास मंदिर या शाळेची तालुक्यातून निवड होऊन जिल्हास्तरीय पुरस्कार पटकावला.

पारितोषिकाचे वितरण समारंभ सोहळा बालगंधर्व रंगभवन रिलायन्स टाऊनशिप नागोठणे येथे पार पडला हा पुरस्कार महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या शुभहस्ते शाळेच्या कार्याध्यक्ष मीना ताई प्रभावळकर व शाळेच्या मुख्याध्यपिका स्नेहा गाढे यांना प्रदान करण्यात आला. शाळा विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडत आहेत. शाळेला मिळालेल्या यशात संस्थेचे पदाधिकारी मंडळाच्या सर्व सदस्य भगिनी शाळेतील सर्व शिक्षिका आणि सेविका यांचा खूप मोलाचा वाटा आहे.



# सारंग शाळेत वार्षिक पारितोषिक वितरण

**चौक : प्रतिनिधी**

विद्या प्रसारिणी सभा चौक संचलित विद्यामंदिर सारंग शाळेत वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ झाला. पारितोषीक वितरण समारंभ प्रमुख अतिथी नलिनी शरद साळोखे माजी केंद्रप्रमुख भिसेगाव यांच्या हस्ते व संस्थेच्या कार्याध्यक्षा शोभा देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

समिक्षा संतोष बामणे हिने मनोगत व्यक्त केले. प्रमूख पाहुण्यांनी शाळेसाठी दोन फिरते चषक, दोन चॅम्पियन ट्रॉफी व प्रत्येक विजयी स्पर्धकासाठी प्रत्येक स्पर्धेसाठी पेन बक्षीस दिले. त्यांनी कै. यशवंतराव उर्फ अण्णासाहेब देशमुख तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थिनी समिक्षा बामणे व दिक्षा पाटील यांना रोख रक्कमेची पारितोषिके देऊन गौरविले. सौ.म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक पंडित पाटील सर यांनी सादर केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय व यादिवाचान कु.शिंदे मॅडम यांनी केले. बाविस्कर सर यांनी उर्वरित यादी वाचन केले. या कार्यक्रमासाठी स.ने. पा. विद्यामंदिर चौकचे सानप सर, वरिष्ठ लिपिक उदय देशमुख, शुभांगी देशमुख, दिपक पांडव उपस्थित होते.



# पेण तालुक्यात माघी गणेशोत्सव उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील रामवाडीमधील आनंदनगर येथे माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी मंदिराचे विश्वस्त डॉ. तुषार मोहन हांडे परिवार यांच्यासह साजेश माने, दिपाली माने तसेच गणेशभक्त उपस्थित होते.

या ठिकाणी प्रामुख्याने माघी गणेशोत्सव सणाबरोबर हळदी कुंकू कार्यक्रम, नवरात्रौत्सव आदी सण साजरे केले जातात. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे मंदिराला दरवाजा नाही जागृत देवस्थान म्हणुन या गणपती मंदिराबाबत भाविकांची श्रद्धा असुन माघी गणेशोत्वनिमित्त हजारो भाविकांनी गणेश दर्शनाचा तसेच महाप्रसादाचा लाभ घेतला.



पेण शहर व तालुका परिसरातील विविध ठिकाणच्या गणेश मंदिरात माघी गणेशोत्सव उत्साहात व भक्तीभावाने साजरा करण्यात आला. शहरातील चावडीनाका येथील चिमण्या गणपती मंदीर, बाजारपेठेतील बांदिवडेकर यांचे गणेश मंदिर, गणपतीवाडी येथील गणेश मंदीर, रामवाडी येथील आनंद गणेश मातृ मंदिर, नवीन वसाहत येथील गणेश मंदीर, प्रभुआळी येथील गणेश मंदीर आदी विविध गणेश मंदिरात माघी गणेशोत्सव साजरा करण्यात आला.

या निमित्ताने मंदीर परिसर विद्युत रोषणाईने तसेच रांगोळ्या काढून सुशोभित करण्यात आले होते. हजारो भाविकांनी श्रीच्या दर्शनाचा लाभ घेतला.


**Tender Notice**

Reputed vendors invited for crack filling and painting.
For "Prem Aangan co.op. Housing society Ltd."
Plot no -51, sec-10, Kamothe, Navi Mumbai.
Sealed Quotations shall be submitted at society office between
**11:00 AM to 4:00 PM on dated 3/02/25 to 18/02/25.**

**TERMS AND CONDITIONS:-**
**1) experience of 5 years**
**2) Other terms and conditions will be discussed and decided by managing committee.**
Kindly contact:- Abhijeet Khaire 7303266060(committee member)
Office address:- A-wing, first floor plot no-51, sector-10, Kamothe.


# महडच्या अष्टविनायक मंदिरात गणेश जन्मोत्सव

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर असलेले अष्टविनायकापैकी महड गावातील वरद विनायक येथे माघी गणपती उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला. याठिकाणी सुंदर अशी रांगोळी काढण्यात आली असून १ फेब्रुवारी रोजी पहाटे जिल्हाधिकारी किशन जावळे सह पत्नी समवेत पुजा झाली.

सकाळी किर्तनाचे आयोजन करण्यात आल्याने आपल्या सुमधुर वाणीमधून ह.भ.प.चारुदत्त महाराज आफळे यांनी सुश्राव्य असे किर्तन करुन गणेश भक्तांस मंत्रमुग्ध केले. या उत्सवाच्या काळात कथक नृत्य, महिला ग्रामस्थांसाठी पैठणीचा खेळ, सिने अभिनेत्री यांचा ही सहभाग असणार आहे. त्याच बरोबर घर बसल्या दर्शन ऑनलाईन युटुब चॅनेल थेट प्रसारण होत आहे. येणा-या गणेश भक्तांस ५ दिवस विनामुल्य रिक्षा, शुद्ध पिण्याचे पाणी, त्याचबरोबर पोलीस प्रशासनाचे मोलाचे सहकार्य लाभत आहे, असे अनेक उपक्रम सुरु असल्याची माहिती कार्याध्यक्ष ॲड. मोहिनी वैद्य या वेळी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

या ठिकाणी भव्यदिव्य अशी रांगोळी (वरद विनायक फुल रांगोळी मंडळ) रवि आचार्य - नेरळ, मंगेश देशमुख - माणकीवली, तुळशिराम ठोंबरे - टेंभरी, सचिन पाटील - कलोते, जिवन ठोंबरे, भरत ठोंबरे, पियूष पाटील, अजय ठोंबरे, नंदिनी ठोंबरे, सोनम पाटील, साक्षी ठोंबरे, स्वरा पाटील आदी कलाकारांनी रांगोळी काढण्यासाठी ८० किलो कणीचा वापर करण्यात आला असून यामध्ये साबुदाणे १० किलो, तीळ २ किलो, मणी २ किलो, विविध कलर्स व ४८ तास रांगोळी कालावधी लागला, असे व्यवस्थापक अतुल तट्टू यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.




**अलिबाग नगरपरिषद**
**आरोग्य विभाग**
**निविदा सुचना सन २०२४-२५**

अलिबाग नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील निविदा सुचनेमध्ये अलिबाग नगरपालिका स्वच्छ भारत अभियान २.० व माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत कामे करणेकामी साहित्य पुरवठा करणेबाबत निविदा मागविण्यात येतआहेत. सविस्तर निविदासुचना दिनांक ०३/०२/२०२५ पासून अलिबाग नगरपरिषद आरोग्य विभागात उपलब्ध आहेत. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल / सुधारणा असल्यास प्रसिध्द करणेत येईल.

**जा.क्र. ३०१**
**दिनांक : ३/०२/२०२५**

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000034761** **Tender No.:EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-40/2024 - 2025.** RFx e-tender for supply of manpower with two wheeler for ground patrolling of underground cable route of 220kV Ulwe-Waghivali I & II line for finding of any digging / excavation / construction activity by various utilities and providing & fixing of route marker at 50 meters on underground cable route of 220kV Ulwe-Waghivali I & II line under EHV O&M Division Panvel….**2nd call.** **Tender amount Rs. 28,95,836/-, EMD amount Rs. 28,958/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **31.01.2025, 18:00 Hrs. to 10.02.2025, 10:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 10.02.2025 up to 10:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **10.02.2025 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

# सागरी स्वच्छतेला प्राधान्य!

## नवी मुंबईत विविध उपक्रमातून १०० गोणी कचरा गोळा

### जागतिक पाणथळ दिनानिमित्त विशेष मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

२ फेब्रुवारी रोजीच्या जागतिक पाणथळ दिवसाचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिका व इन्व्हायरमेंट लाईफ (मँग्रुव्हज सोल्जर) आणि सेव्ह नवी मुंबई या दोन पर्यावरण क्षेत्रात कार्यरत सेवाभावी संस्थांच्या सहयोगाने बेलापूर विभागात टी एस चाणक्य पाठीमागील सागरी किनारा या ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.



महापालिकेकडून स्वच्छता विषयक विविध उपक्रम राबविण्यात येत असून आज जागतिक पाणथळ दिनाचे औचित्य साधून ही विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये परिमंडळ १ चे उपायुक्त सोमनाथ पोटरे, बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. अमोल पालवे, कार्यकारी अभियंता राजेश पवार, स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर, स्वच्छता निरीक्षक विजय नाईक यांच्यासह इन्व्हायरमेंट लाइफचे प्रमुख धर्मेश बराई, सेव्ह नवी मुंबईचे प्रमुख सुनील अग्रवाल व श्रुती अग्रवाल, डी.के. जैन, राहुल रासकर, नील सिद्धी ग्रुपचे प्रमुख कल्पेश पालन आणि त्यांचे सहकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

नवी मुंबई महानगरपालिका आयोजित करीत असलेल्या स्वच्छता मोहिमांना युवकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग लाभ होत असून आजच्याही स्वच्छता मोहिमेत एसआयईएस महाविद्यालय नेरुळ, एससीओई महाविद्यालय खारघर आणि के बीपी महाविद्यालय व डीएलएलई DLLE गटाच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा समावेश होता.

या विशेष मोहिमेअंतर्गत पाणथळ जागांमधून १०० हून अधिक गोणी कचरा काढून टाकण्यात आला. यामध्ये प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिक बाटल्या, एकल वापर प्लास्टिकचे प्रमाण अधिक होते. या मोहिमेद्वारे पाणथळ जागांच्या स्वच्छतेच्या माध्यमातून स्थानिक पर्यावरणाचे रक्षण करण्यात महत्त्वपूर्ण योगदान देण्यात आले. ही मोहीम यशस्वीरित्या व योग्य पद्धतीने राबवण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

सकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत आयोजित या विशेष स्वच्छता मोहिमेत शंभरहून अधिक पर्यावरण प्रेमी विद्यार्थी व नागरिकांनी उत्साही सहभाग घेतला. सीवूड्स येथील श्री बामनदेव अंडरपासजवळील मैदानावर सर्वांनी एकत्र येऊन प्लास्टिक बंदी व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत सामुहिक शपथ घेतली. या वेळी कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

## नवी मुंबईत आज जनता दरबार

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्याचे वने मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार गणेश नाईक यांच्या जनता दरबाराचे नवी मुंबई येथे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवार ३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात हा जनता दरबार पार पडणार आहे. प्रशासन आणि नागरिकांना एकाच व्यासपीठावर आणून जनतेच्या प्रश्नांची प्रभावीपणे सोडवणूक करणारा हा उपक्रम आहे. एकीकृत ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद भूषवित असताना सलग १५ वर्षे नियमितपणे नामदार गणेश नाईक यांनी जनता दरबाराचे आयोजन करून लाखो नागरिकांना दिलासा दिलेला आहे.

ठाणे जिल्ह्यातील शहरी भागाबरोबरच आदिवासी आणि ग्रामीण भागातही नियमितपणे जनता दरबार भरवून नामदार गणेश नाईक यांनी जनतेच्या विविध समस्यांचे निराकरण केलेले आहे. जनता दरबारासाठी येताना नागरिकांनी आपल्या लेखी निवेदनाच्या तीन प्रती सोबत आणाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

# डीपीएस फ्लेमिंगो तलावासाठी नवी मुंबईत मूक मानवी साखळी



**नवी मुंबई : बातमीदार**

३० एकर डीपीएस फ्लेमिंगो तलावाला संवर्धन राखीव म्हणून वाचवण्यासाठी, रविवारी (दि.२) जागतिक पाणथळ जागा दिनानिमित्त मोठ्या संख्येने पर्यावरणप्रेमींनी जलाशयाजवळ मूक मानवी साखळी तयार केली. पाणथळ जागा त्वरित स्वच्छ केली पाहिजे. भरती-ओहोटीतील पाण्याचा प्रवाह पूर्ववत केला पाहिजे, असे नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी.एन. कुमार यांनी माहिती देताना सांगितले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड (एनएमआयएएल) प्रकल्पाच्या परिसरातील जैवविविधता वाचवण्यासाठी वचनबद्ध असूनही, डीपीएस फ्लेमिंगो तलावासारख्या पाणथळ जागा जाणूनबुजून नष्ट केल्या जात आहेत, असे कुमार म्हणाले. कार्यकर्त्यांनी धरलेल्या फलकांवर असे संदेश लिहिलेले होते: पाणथळ जागा पडीक नाहीत; निसर्गाचे सौंदर्य नष्ट करू नका; फ्लेमिंगो घरे वाचवा - आमची पाणथळ जागा; निसर्गाचे रक्षण करा - ते तुमचे रक्षण करेल; गुलाबी तलाव लाल करू नका; आणि फ्लेमिंगो सिटीमध्ये फ्लेमिंगो बेघर अशा आशयाचे संदेश लिहिलेले फलक आंदोलकांनी झळकावलेले पाहायला मिळाले.

### वनमंत्र्यांची घेणार भेट

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने आंतरभरती संबंधी पाणथळ जागा संरक्षित आहेत आणि भरती-ओहोटीच्या रेषेपर्यंतचा परिसर जतन आणि संवर्धन केला पाहिजे. राज्य वन मंत्रालयाने नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय समितीच्या निर्णयानुसार या पाणथळ जागेला संवर्धन राखीव म्हणून घोषित करण्यात आले आहे, असे कुमार नी सांगितले. शहराच्या जैवविविधतेचा भाग म्हणून डीपीएस फ्लेमिंगो तलाव वाचवण्याची गरज पटवून देण्यासाठी पर्यावरणवाद्यांचे शिष्टमंडळ वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेणार आहे.

मानवी साखळीत सहभागी झालेले माजी आमदार संदीप नाईक यांनी कार्यकर्त्यांचे कौतुक केले. तलावाजवळून जाणाऱ्या अनेक पक्षीप्रेमींनी थांबून कार्यकर्त्यांनी लावलेले फलक आणि बॅनर वाचले.





**पनवेल :** माघी गणेशोत्सवानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी आदई येथील श्री अष्टविनायक मित्र मंडळाच्या गणपती बाप्पाचे तसेच आदई गावात विराजमान गणपतीचे दर्शन घेतले. त्यांचा आयोजकांकडून सन्मान करण्यात आला. सोबत माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील व इतर.



**उलवे :** येथील सुधीर जांभवडेकर यांच्या घरातील माघी गणेश.

## सीवूड्स विभागातील सुविधांसाठी अर्थसंकल्पामध्ये निधीची मागणी

### विशाल डोळस यांचे आयुक्तांना पत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

सीवुड्स विभागात अनेक सामाजिक सुविधांची गरज आहे. ही कामे पूर्ण करण्यासाठी निधीची आवश्यकता लागणार आहे. या सुविधा पूर्ण करण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करावी, अशी मागणी माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे.

सेक्टर ५०. जुने भूखंड के २ याठिकाणी सिथौक सेंटर उभारावे, त्यातही अंदाजे खर्च ५० ते ६० कोटी निधीची तरतूद करावी. सिवुड सेक्टर ५० जुने ते सावळा हॉस्पिटल याठिकाणी जॉगिंग ट्रॅक बनवावा, त्यासाठी अंदाजे रक्कम १४ कोटी रक्कमेची तरतूद करावी. सेक्टर ५० येथील सीबीएसई शाळेजवळ टर्फ उभारावा. यासाठी अंदाजे २ कोटी निधीची तरतूद करावी. सेक्टर ४८ येथील अंतर्गत रस्त्यातील खराब झालेल्या सिव्हरेज लाईन बदलाव्यात.

नवरत्न हॉटेल ज्याठिकाणी काँक्रिटचा रस्ता बनवावा. सेक्टर ४८ येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानात मूळ प्रस्तावातील राहिलेली महत्व पूर्ण कामे करावीत. सेक्टर ४४ येथील बस डेपोच्या जागेवर बहुउद्देशीय इमारत उभारावी, अशा अनेक मागण्या डोळस यांनी आयुक्तांकडे केल्या आहेत.



**पनवेल :** खांदा कॉलनीतील प्रसाद बागकर यांच्या घरातील माघी गणराय.



**पनवेल :** उलवे सेक्टर ८ येथे उलवे बोंगियो सांस्कृतिक परिषदेच्या वतीने वसंत पंचमीनिमित्त सरस्वती पुजेचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. त्यांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले. या वेळी माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील व अन्य उपस्थित होते.

## कोकणातून हापूस आंब्याच्या १४९ पेट्या एपीएमसीत

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

वाशीच्या एपीएमसी बाजारात माघी गणेश जयंतीच्या निमित्ताने शनिवार रोजी हापूस आंब्याच्या तब्बल १७५ पेट्या दाखल झाल्या. १ फेब्रुवारी रोजी झालेली ही सर्वोच्च आवक मानली जात आहे.



यंदा हवामान बदलाने हापूसच्या उत्पादनाला फटका बसला. हापूसला मोहोर फुटण्याची वेळ आणि हवामान बदल, परतीचा पाऊस तसेच कडाक्याची थंडी त्यामुळे अतिमोहोर फुटला. त्यामुळे बहुतांश ठिकाणी फळधारणा झाली नाही. थ्रिप्स रोगामुळेदेखील मोहोर गळून गेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊन, हापूसची आवक होण्यास यंदा उशीर झाला आहे. काही दिवसांपूर्वी हापूसच्या २४ पेट्या मार्केटमध्ये दाखल झाल्या होत्या.

शनिवारी बाजारात कोकणातील हापूसच्या १७५ पेट्या दाखल झाल्या होत्या. त्यापैकी आपल्या रसाळ व गोडव्यासाठी जगप्रसिद्ध असलेल्या देवगड हापूसच्या १४९ पेट्यांचा समावेश आहे. देवगड हापूसची एक पेटीची सात हजार ते १५ हजार रुपये बाजारभावाने विक्री होत आहे. आवक कमी असल्याने दर जास्त असून, आवक वाढल्यावर सर्वसामान्य रालश प्रेमींना देखील जिभेचे चोचले पुरवता येणार आहेत, मात्र तोपर्यंत खवय्यांना वाट पहावी लागणार आहे. १५ मार्चनंतर बाजारात हापूसची आवक वाढणार आहे, अशी माहिती एपीएमसी फळबाजारचे संचालक संजय पानसरे यांनी दिली.

## कोपरा गावात चिकन सेंटरमध्ये चोरी

**खारघर : प्रतिनिधी**

खारघरमध्ये चोरटयांनी थैमान घातला आहे. नुकतेच कोपरा गावातील सुभाष पवार पत्राचाळीत चिकन सेंटरचा व्यवसाय करणाऱ्या अमीर खान (वय २१) याच्या चिकन सेंटरमध्ये अज्ञात चोरटयांनी प्रवेश करून ४५ हजार रोकड आणि एक मोबाईल लंपास केला. विशेष म्हणजे चोरट्याच्या विना मास्क मुक्त संचाराच्या हालचाली सीसीटीव्हीत कैदय झाल्याने परिसरात रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.



चोरट्याने या चिकन सेंटरमध्ये झोपलेल्या उस्मान खान (वय ३८) याचा खिसा ब्लेडने कापून या खिशातून पैसे लंपास केले तसेच याठिकाणाहून फोनदेखील लंपास केला. कोणत्याही मुखवट्याने आपली ओळख न लपवता चोरट्याने आजूबाजूच्या गाड्या देखील तपासल्या त्यात काहीच मिळाले नसल्याने चोरटा आलेल्या स्कुटीवरून पसार झाला.अशाप्रकारे चोरटा सहज मुक्त संचार करीत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. खारघर पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

खारघर शहरात नजीकच्या काळात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. मुखवटा न लपवणाऱ्या या चोरट्याने जणू काही आव्हान दिल्याचे दिसून येत आहे. या घटनेची तक्रार करण्यासाठी गेलेल्या चिकन सेंटरचे मालक अमीर खान याला २९ जानेवारी रोजी पोलीस स्टेशनमध्ये संबंधित ठाणे आमलदारांनी पोलीस ठाण्यातच बसून ठेवले, मात्र गुन्हा दाखल करून घेतला नाही. यानंतर संबंधित बाब वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सुर्वे यांच्या निर्दशनास आणुन दिल्यानंतर सर्वे यांनी तत्काळ गुन्हा नोंदवून घेतला.

### क्लिक...क्लिक...!



**उदयपूर (राजस्थान) :** पर्यटकांचे आकर्षण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिचोला तलावात बोटींग केली जाते. या ठिकाणी लेक पॅलेस लक्ष वेधून घेतो.

## राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा होणार सत्कार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भारत क्रांती मिशन आणि राष्ट्रीय शिवजन्मोत्सव सोहळा समिती, कानसा वारणा फाउंडेशनचे वावर्ले चौक येथील संस्थापक अध्यक्ष दिपक पाटील, विजय काकडे आणि विलास पांगारकर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती उत्सव आणि गुजरातचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि.१९) सकाळी १० वाजता जयपुर-राजस्थान येथे होणार आहे.

दरम्यान, महाराष्ट्रात चौक वावर्ले येथील दिपकदादा पाटील यांचे कार्यक्रम होत असताना नागरिकांना सामाजिक कार्य करण्याचे आवाहन करत आहेत तसेच ते भारत क्रांती मिशनचे पदाधिकारी असल्याने युवकांना समाजकार्यात अग्रेसर राहण्याचा सल्ला देत असून समाजहित जोपासण्याचे कार्य दिपक दादा पाटील यांच्याकडून होताना दिसत आहे.

# खोरा बंदरातील नवीन जेट्टीचे काम पूर्ण



**मुरूड : प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला पर्यटकांना अगदी सुलभरित्या पाहता यावा यासाठी केंद्र सरकारच्या सागरमाला योजनेंतर्गत सुमारे ११० कोटी रुपये खर्च करून मुरूड शहराच्या अगदी जवळ असणाऱ्या खोरा बंदरात जेट्टी बांधण्यात आली आहे.

प्रवासीवर्गाच्या सुविधेसाठी समुद्राच्या आत तीन मीटर लांब व पाच मीटर रुंदीचा घेर असणाऱ्या या जेट्टीचे काम पूर्ण झाले आहे. जेट्टीचे काम दोन वर्षाच्या आतच पूर्ण करण्यात आले आहे. सध्या जेट्टीचे संरक्षक लोखंडी पाईपना कलर करणे; त्याच प्रमाणे जेट्टीचे कलर काम बाकी आहे. लवकरच हे कामसुद्धा पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून देण्यात आली.

खोरा बंदरातील आधीची जेट्टी ही खूप जुनी तसेच समुद्रातील लांबी कमी असल्याने ओहोटी वेळी बोटी किनाऱ्यावर लागणे जिकिरीचे व त्रासाचे होत असे. अशावेळी समुद्राच्या भरतीची वाट पहावी लागावी लागल्याने कित्येक पर्यटकांना समुद्रात तासन्‌तास अडकावे लागत असे. पर्यटकांचा खोळंबा होऊ नये यासाठी तत्काळ नवीन जेट्टीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

नवीन जेट्टीमुळे पर्यटकांना जंजिरा किल्ला पाहणे अगदी सुलभ होणार आहे. लवकरच या जेट्टी काम पूर्ण करून याचे लोकार्पण सोहळा होणार आहे.

ऐतिहासिक जंजिरा किल्ला पहाण्यासाठी असंख्य पर्यटक व शालेय विद्यार्थी वर्षाला सात लाखपेक्षा जास्त येत असतात. जंजिरा किल्ला पाहण्यासाठी राजपुरी व खोरा जेट्टी येथून अगदी सहज जाता येते. जंजिरा किल्ला बोटीमधून जाण्याचे १०० रुपये आकारले जातात, तर शालेय विद्यार्थ्यांना ५० रुपये तिकिट आकारले जाते. किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी पुरातत्व खात्याचे २५ रुपये प्रतिमाणशी शुल्क आकारले जाते. प्रत्येक प्रवाशामागे १० रुपये लेव्ही कर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाला मिळत असतो. जंजिरा किल्ल्यामुळे मेरीटाईम बोर्ड, बोटधारक यांना मोठा आर्थिक फायदा होत आहे. एका किल्ल्यापासून सर्व शासकीय यंत्रणा तसेच बोटधारकांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे.

# रोहे शिंपी समाजातर्फे माघी गणेशोत्सव साजरा

## भाविकांची गर्दी

**रोहे : प्रतिनिधी**

१२९ वर्षे पुरातन प्रसिद्ध असलेल्या रोहे –अष्टमी नामदेव शिंपी समाजाच्या श्री गणेश मंदिरात समाजाचे अध्यक्ष मकरंद बारटक्के व महिला मंडळ अध्यक्षा संपदा पतंगे यांच्या मार्गदर्शना खाली समाजाचे कमिटी पदाधिकारी व रोहे–अष्टमीमधील समाज बांधव–भगिनी यांनी भाग घेऊन माघी श्री गणेशोत्सव मोठ्या भक्तीभावाने उत्साहात साजरा करण्यात आला.






आध्यत्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य रवींद्र पतंगे यांनी केले. दिवसभर गणेशाची भक्तीपर गाणी तसेच संपूर्ण मंदिर विद्युत रोषणाई आणि रंगी–बेरंगी फुलांच्या माळानी तसेच सुबक रांगोळ्यांनी मंदिर सुशोभीत केले होते. आजूबाजूचे वातावरण अगदी प्रसन्न आणि भक्तिमय झाले होते.

सायंकाळी प्रसिद्ध संजय चौधरी आणि त्यांचे सहकारी (किल्ला) यांचे सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम झाला. शहरातील प्रतिष्ठित मान्यवरांनी तसेच भाविक बंधू–भगिनी यांनी पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत श्रीचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाविकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.

# टीएमसी कॉलेजमध्ये शिष्यवृत्तीचे वाटप



**माणगाव : प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या माणगाव येथील जे.बी. सावंत एजुकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये शिक्षण घेत असलेल्या ३५ होतकरू व गरीब विद्यार्थिनींना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

मुंबई विद्यापीठातील प्राचार्य संघटनेमार्फत २६०४०० रुपये रकमेचा धनादेश महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाप्रसंगी प्रमुख पाहुणे जे.बी.सावंत एजुकेशन सोसायटी मुंबई संचालक भाऊसाहेब सावंत व महाविद्यालयीन विकास समिती सदस्य रामदास पुराणिक यांच्या हस्ते देण्यात आले.

शिष्यवृत्ती वाटप कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कॉलेजचे प्रभारी प्राचार्य अशोक मोरे यांनी सांगितले की, मुंबई विद्यापीठातील प्राचार्य संघटनेच्या सहकार्यामुळे गेल्या पाच वर्षांपासून ग्रामीण भागातील होतकरू व गरीब मुलींना शिक्षणाकरिता शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्यात येत आहे, असे सांगत प्राचार्य संघटनेचे ऋण व आभार व्यक्त केले.

कार्यक्रमास दिलीप ढेपे व योगिता जाधव यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमास कॉलेजचे प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागोठणे येथील मंदिरात विविध कार्यक्रम

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे गवळआळीतील श्री राधाकृष्ण साईबाबा गणपती मंदिराचा आठवा वर्धापन दिन सोहळा सोमवार ३ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रमाने व ग्रामस्थ मंडळींच्या सहकार्याने होत आहे. त्यानिमित्ताने श्री सत्यनारायण महापूजा, हरिपाठ, कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहेत.

श्री राधाकृष्ण साईबाबा गणपती मंदिर वर्धापन दिन सोहळा यशस्वी करण्यासाठी विश्वस्त मंडळ अध्यक्ष विलास चौलकर, सेक्रेटरी सुदाम घाग, ग्रामस्थ मंडळ उपाध्यक्ष गणेश घाग, खजिनदार दिनेश घाग, सहसेक्रेटरी प्रभाकर पाटील, सहखजिनदार विजय चौलकर, कार्याध्यक्ष प्रसाद जोगत, रवींद्र वाजे, संतोष पाटील व ग्रामस्थ मंडळ गवळआळी विशेष मेहनत घेत आहेत.

नागोठणे शहर व विभागातील सर्व ग्रामस्थांनी तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, अशी विनंती श्री राधाकृष्ण साईबाबा गणपती मंदिर विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष विलास चौलकर यांनी केले आहे.

# माजगावमध्ये मोफत नेत्र तपासणी आणि मोतिबिंदू शस्त्रकिया शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील समर्थ नेत्रालयाच्या वतीने रसायनी पाताळगंगा परिसरातील माजगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या आवारात मोफत डोळे तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रीया शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात एकूण १४९ रुग्णांनी तपासणी केली. या तपासणीत १९ रुग्णांना मोतिबिंदूचा आजार असल्याचे तपासणीत दिसून आले. या वेळी रुग्णांची अत्याधुनिक कॉम्प्युटरव्दारे डोळे तपासणी करुन त्यांना मोफत आयड्राप वाटप करण्यात आले.

या शिबिरात नेत्ररोग तज्ञ डॉ. विशालाक्षी शेडबाळे यांनी रुग्णांना मार्गदर्शन केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी माजगाव ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सदस्यांसह मच्छिंद्र पाटील यांनी विशेष सहकार्य केले.



# मोरे महिला महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत रॅली

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव येथील एम.बी. मोरे फाउंडेशन कला वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत ३० जानेवारी रोजी महाविद्यालयामध्ये रस्ता सुरक्षा अभियान आधारित महाविद्यालय ते रोठ बुद्रूकपर्यंत रस्ता सुरक्षा अभियान सप्ताह रॅली काढण्यात आली तसेच रॅलीदरम्यान अग्निशामक दल धाटाव येथे विद्यार्थिनींनी भेट दिली.

महाविद्यालयीन शिक्षक प्रा. ममता बिंद, प्रा. ऋतुजा कांबळे, महिलावर्ग रॅलीसाठी उपस्थित होते. त्याचबरोबर रॅलीचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. मयूर पाखर यांनी केले. या रॅलीमध्ये ५३ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.




# सुडकोली शाळेला संगणक, वॉटर फिल्टर भेट



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा सुडकोली यांना आयडीबीआय बँक शाखा वावे यांच्या सौजन्याने संगणक आणि वॉटर फिल्टर प्रदान सोहळा झाला.

आयडीबीआय बँक शाखा वावे यांच्या सौजन्याने नुकतेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शुद्ध व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी वॉटर फिल्टरची व्यवस्था करण्यात आली. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान प्राप्त व्हावे, त्यांना संगणक हाताळता यावा यासाठी संगणक संच देऊन शाळेला उपकृत केले.

कार्यक्रमास मुख्याध्यापक मनोहर महादेव पाटील, आदर्श शिक्षक नाना भोपी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रशांत म्हात्रे, उपाध्यक्ष प्रणाली तांबडकर, सदस्य प्रतीक्षा पाटील, नामदेव तांबडकर, ग्रामस्थ श्री. साळावकर, शाळा व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष महेश वावेकर, सदस्य प्रणव तांबडकर, मोरेश्वर पाटील, अखिल नवगाव अध्यक्ष तथा दिनाभाई मोरे शिक्षण संस्था सानेगावचे जीवन पाटील, ज्येष्ठ सदस्य नवनीत पाटील आदी उपस्थित होते

# वाशिवली आदिवासीवाडीत हळदीकुंकू कार्यक्रम उत्साहात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वाशिवली आदिवाडीमध्ये दरवर्षीप्रमाणे हळदीकुंकू कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला आठ वाड्यांमधील महिला व मुली जवळपास २२० ते २५० उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. प्रत्येक वाडीतील महिलांनी दीपप्रज्वलन केले. या वेळी वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्यकर्त्या जयश्री वाघमारे यांनी भारतमातेचा व हुतात्मा नाग्यादादा यांच्या मूर्तीचे पूजन केले. नंतर वाघमारे यांनी राणी गायदुल्डी यांची थोडक्यात माहिती दिली तसेच हळदीकुंकू का करावे याबाबत सांगितले.

वाशीवली वाडीतील महिला बचत गटाचे मोलाचे सहकार्य लाभले. खूप छाप कार्यकम झाला. वाघमारे, जयश्री घोडविंदे व माई पवार यांनी सगळ्या महिलांचे आभार मानले.



# अंजुमन इस्लाम महाविद्यालयातर्फे विविध स्पर्धा व पथनाट्य

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रायगड जिल्हा पोलीस दल आणि जिल्हा वाहतूक शाखा रायगड–अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते ३१ जानेवारी या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियान महाविद्यालयातर्फे राबविण्यात येत आहे.



नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेविषयी जनजागृतीसाठी रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरूड जंजिरा येथे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा तसेच कार्यशाळेचे आणि पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते.

अंजुमन इस्लाम जंजिरा सिद्दी जफर शेखानी मेमोरियल खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुरूड जंजिरा येथे रस्ता सुरक्षा जनजागृतीवर पथनाट्य सादर करण्यात आले तसेच उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना वाहतुकीच्या नियमांचे महत्त्व समजावून सांगितले आणि पथनाट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा आणि वाहतूक नियमांविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाला मुरूड पोलीस ठाण्याचे निरीक्षक नामदेव बंडगर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख, वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संतोष गायकवाड, पोलीस नाईक किशोर बटारे, पोलीस हवालदार मकरंद पाटील, पोलीस अंमलदार सुरते आणि अंजुमन इस्लाम औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शाहीद कलाब, रफीक उल्डे आणि बुरान उल्डे उपस्थित होते.

या कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. फिरोज शेख, समितीचे प्रा. अल्ताफ फकीर, विद्यार्थी प्रतिनिधी माज दाते, उसामा नखतारे, अरफात लसने, जेन दाते, ताहीर उल्डे, कैफ कादिरी, देवेश सुर्वे, मुहीत सावरी, शारीब काझी, ओंकार म्हात्रे ई. यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रसायनीत फिट इंडिया मॅरेथॉन

## १४५० धावपटूंचा सहभाग

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या रसायनी येथील पिल्लई एचओसी एज्युकेशनल कॅम्पसने भारतीय क्रीडा प्राधिकरण, युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २) फिट इंडिया मॅरेथॉन आयोजित केली होती. फिटनेस का डोस, आधा घंटा रोज या घोषवाक्याला अनुसरून १५ ते ६८ वयोगटातील १४५० स्पर्धकांनी मोठ्या उत्साहाने स्पर्धेत सहभाग घेतला.

स्पर्धा मिनीथॉन ५ किमी आणि १० किमी अशा प्रकारात आणि एकूण सहा गटांमध्ये घेण्यात आली. पिल्लई एचओसी कॅम्पसमधून स्पर्धेला सुरुवात झाली. महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या डेप्युटी सीईओ डॉ. लता मेनन यांच्या उपस्थितीत शर्यतींना झेंडा दाखवला. पीआरओ डॉ. निवेदिता श्रेयांस, क्रीडा संचालक पद्मक्षन पद्मनाभन आदींसह शिक्षक उपस्थित होते.

सर्व गटातील विजेत्यांना रोख रक्कम, पदके व चषक प्रदान करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय सीमाशुल्क (मुंबई)चे सहसंचालक अमृताश्व कमल, भारतीय क्रीडा प्राधिकरण प्रतिनिधी सुश्री प्रियांका आलिम उपस्थित होते.

**गटनिहाय विजेते**

१८ वर्षाखालील : मुले-प्रथम राज भगत, व्दितीय राज चौहान,तृतीय यश निंदेकर, मुली-प्रथम अनुष्का गुप्ता, व्दितीय मुक्तिका संभ्याळ, तृतीय प्रतिमा भगत; १८-४० वर्ष : पुरुष गट-प्रथम कल्पेश देवरे, व्दितीय रामू पारडी, तृतीय संदीप पाल, महिला गट-प्रथम देविका सोनावणे, व्दितीय समृद्धी लवटे, तृतीय मयुरी पाटील; ४० वर्षांवरील : पुरुष गट-प्रथम कमली भगत, व्दितीय अमित विचारे, तृतीय सुनील पनघाट, महिला-प्रथम सुनैना नागरथने, व्दितीय-श्रद्धा काळे, तृतीय शिखा पांड.





# जीवनगौरव पुरस्काराने सचिन तेंडुलकर सन्मानित

## उत्कृष्ट कामगिरी केलेल्या २६ खेळाडूंचा गौरव

**मुंबई : प्रतिनिधी**

बीसीसीआयच्या नमन अवॉर्ड्स २०२३-२४चा पुरस्कार सोहळा शनिवारी पार पडला. या पुरस्कार सोहळ्यात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या क्रिकेटपटूंना बीसीसीआयने पुरस्कार देत सन्मानित केले.

सचिन तेंडुलकरला बीसीसीआयने सीके नायडू जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे. सचिनला आयसीसीचे अध्यक्ष आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष जय शाह यांच्याकडून हा खास पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी उपस्थितांनी उभे राहून सचिनचे कौतुक केले. जसप्रीत बुमराहला पॉली उमरीगर पुरस्कार प्रदान करण्यात आला. रविचंद्रन अश्विनलाही विशेष पुरस्कार देण्यात आला, तर टी-२० विश्वचषक विजेत्या क्रिकेटपटूंचाही खास सन्मान करण्यात आला.



**नमन पुरस्कार विजेत्यांची यादी**

देशांतर्गत क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी - मुंबई क्रिकेट असोसिएशन
देशांतर्गत क्रिकेट - रणजी ट्रॉफीत सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज
प्लेट ग्रुप - तनय त्यागराजन हैदराबाद
एलिट ग्रुप - साई किशोर तमिळनाडू
देशांतर्गत क्रिकेट - रणजी ट्रॉफीत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज
प्लेट ग्रुप - अग्नी चोप्रा - मिझोरम
एलिट ग्रुप - रिकी भुई - आंध्रप्रदेश
देशांतर्गत क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारा अष्टपैलू खेळाडू लाला अमरनाथ अवॉर्ड
शशांक सिंग - छत्तीसगढ
रणजी ट्रॉफीत उत्कृष्ट कामगिरी करणारा अष्टपैलू खेळाडू लाला अमरनाथ अवॉर्ड तनुष कोटियन
सर्वात्कृष्ट पंच - देशांतर्गत क्रिकेट अक्षय तोत्रे

# रोह्यातील जलतरणपटूंची चमकदार कामगिरी



**रोहे : प्रतिनिधी**

उरण येथील बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुलात रायगड जिल्हा असोसिएशनच्या माध्यमातून जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा या विषय विकास सामाजिक संस्थेमार्फत आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत विविध वयोगतील जलतरणपटूंनी भाग घेतला होता. यात रोह्याच्या जे.एम. राठी स्विमिंग पूलमध्ये सराव करणाऱ्या जलतरणपटूंनी चमकदार कामगिरी केली.

स्पर्धेत रोह्याच्या अनय रोहित गाडगे याने ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये सुवर्णपदक व ५० मीटर बॅकस्ट्रोक कांस्यपदक, श्रेयस दीपक पराडकर २५ मीटर फ्री स्टाइल सुवर्णपदक, ऋग्वेद दिनेश कुथे फ्री स्टाईल व बॅकस्ट्रोक रौप्यपदक, तर बटरफ्लाय कांस्यपदक, मानस चेतन कुथे ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक व फ्री स्टाईल रौप्यपदक, समृद्धी सुनील वाघमोडे हिने ५० मीटर बटरफ्लाय व बॅकस्ट्रोकमध्ये कांस्यपदक पटकाविले.

या खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक भूषण शिर्के, उपप्रशिक्षक भूषण म्हात्रे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे मुख्याध्यापिका लीना डेव्हिड, उपमुख्याध्यापक दीपक माने यांच्यासह गुरुजनवर्ग, पालकांनी कौतुक व अभिनंदन केले.

# पनवेल महापालिकेचा क्रीडा महोत्सव उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका शिक्षण विभागाचा क्रीडा महोत्सव नुकताच छत्रपती संभाजी महाराज मैदानावर घेण्यात आला. यामध्ये विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेत प्रतिसाद दिला.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली व शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या सूचनेनुसार आधी महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी उपायुक्त प्रसेनजित कार्लेकर यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजी महाराज मैदानावर भव्य क्रीडा महोत्सव घेण्यात आला. शिक्षणाधिकारी चव्हाण यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून या महोत्सवाला सुरुवात करण्यात आली.



या वेळी कबड्डी, डॉजबॉल असे सांघिक खेळ घेण्यात आले. सर्व मुलांनी खेळांमध्ये हिरीरीने व खेळीमेळीच्या वातावरण वातावरणात खिलाडी वृत्तीने सहभाग घेतला. दरम्यान, अतिरिक्त आयुक्त भरत राठोड यांनी या क्रीडा महोत्सवास भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सर्व स्पर्धा झाल्यानंतर विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभास उपायुक्त वैभव विधाते, लेखाधिकारी मंगेश गावडे, लेखापरीक्षक निलेश नलवडे व सहाय्यक आयुक्त स्मिता काळे उपस्थित होते. महापालिका शिक्षण विभागाची मानाची चॅम्पियनशिप शाळा क्रमांक २ने पटकावली.

क्रीडा महोत्सवासाठी क्रीडा प्रमुख प्रमोद लांगी, खेळ प्रशिक्षक वैभव पाटील, वैशाली पाटील, ज्योत्स्ना भरडा, सुभाष ठोंबरे, वैभव पाटील, शुभांगी चव्हाण यांचे सहकार्य लाभले.





**उलवे नोड : महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर विभागाच्या वतीने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कला, क्रीडा गुणांना वाव मिळावा म्हणून राज्यस्तरीय रंग महोत्सव इंद्रधनुष्य २०२५चे आयोजन रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारीपर्यंत करण्यात आले होते. दरम्यान, या महोत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी भेट दिली. राज्य कर आयुक्त आशिष शर्मा, विशेष आयुक्त अभय महाजन, रायगड विभागाचे हरीश गांगुर्डे यांच्यासह राज्यस्तरीय सुकाणू समितीचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महोत्सवाचे कौतुक करून उपस्थित मान्यवरांना शुभेच्छा दिल्या.**

# राही सरनोबतचे ‘सोनेरी’ पुनरागमन


## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत जिंकले सुवर्णपदक

**डेहराडून : वृत्तसंस्था**

आजारपणामुळे जवळजवळ दोन वर्षे स्पर्धात्मक नेमबाजीपासून दूर असलेली कोल्हापूरची सुवर्णकन्या राही सरनोबतने ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील सोनेरी वेध घेत शानदार पुनरागमन केले. सातव्या फेरीत राहीच्या पिस्तुल बिघाड होऊनही संयमी खेळ करीत तिने अचूक निशाणा घेतला.

महाराणा प्रताप क्रीडा संकुलातील त्रिशुल शूटिंग रेज राहीच्या यशाने जय महाराष्ट्राने दुमदुमली. अनुभवी राहीने २५ मीटर पिस्तुल प्रकारातील अंतिम लढतीत ३५ गुणांनी सुवर्णपदकाचा वेध घेतला. सुरुवातीला पिछाडीवर असलेल्या राहीने चौथ्या फेरीपासून आघाडी घेतली. सातव्या फेरीत राहीच्या पिस्तुलात थोडासा तांत्रिक बिघाड झाला होता. त्याकडे दुर्लक्ष करीत तिने शेवटपर्यंत संयम दाखवित सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या तांत्रिक बिघाडाच्या वेळी सिमरन हिने राहीला मागे टाकण्याचा प्रयत्न केला, पण राहीने पिस्तुलाच्या बिघाडानंतरचे दोन्ही नेम अचूक साधले आणि आपली विजयी आघाडी कायम ठेवली. राहीच्या सोनेरी पुनरागमनाचा आनंद पदक वितरण समारंभातही प्रकटला.






**पनवेल : रायडर बॉईज क्रिकेट संघ नवीन पनवेलच्या वतीने एक दिवसीय अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचीही उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील तसेच भिकोबा कदम, मयूर कदम, विवेक होन, अक्षय सिंह, चेतन पालकर, अजिंक्य मैंने, बाबू गायकवाड, ओमकार तारी, मोहित शर्मा, सचिन सुर्वे, गोपीनाथ म्हात्रे, चेतन पालकर आदी उपस्थित होते.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com